दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरुवार दि.३ जुलै २०२५ | वर्षे४थे | अंक२९७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# मातोश्रीकडे डुप्लिकेट शिवसेना

## माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे यांची टीका

◆ मुंबई (विशेष प्रतिनिधी) :

खरी शिवसेना आता एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे डुप्लिकेट शिवसेना आहे. त्यांनी अडीच वर्षांत शिवसेनेची वाट लावली, अशी टीका माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे यांनी केली. उद्धव ठाकरे काही झाले तरी राज ठाकरेंना त्यांच्या शिवसेनेत स्थान देणार नाहीत. कारण तसे झाले तर उद्धव ठाकरेंचे अस्तित्व धोक्यात येईल, असा टोला नारायण राणे यांनी लगावला. विधान भवनात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे मातोश्री निवासस्थानाचा एक हिस्सा राज ठाकरेंना देणार का, असा खोचक सवालही त्यांनी विचारला.

**अडीच वर्षांत शिवसेना संपवली**

ज्या मराठी माणसाने शिवसेनेला ताकद दिली त्याच मराठी माणसाची उद्धव ठाकरेंनी वाट लावली. ४० वर्षांत बाळासाहेबांनी शिवसेना उभारली. पण तीच शिवसेना अडीच वर्षांत संपवली असे राणे म्हणाले. मुंबईत फक्त १८ टक्के मराठी उरलेत. १९६० साली ते ६० टक्के इतके होते. मराठी माणसाला मुंबई बाहेर काढण्याला कोण जबाबदार असेल तर ते उद्धव ठाकरे आहेत. उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना फक्त दोनच दिवस मंत्रालयात आले. आजच त्यांना मराठी कसे आठवले? मराठी तरुणांसाठी रोजगार मिळावा यासाठी त्यांनी काय केलं? मराठीचा एवढा पुळका आला असेल तर स्वतःच्या मुलाला इंग्रजी शाळेत का टाकले? शरद पवार, सोनिया गांधींसोबत गेल्यानंतर त्यांना मराठी आठवली नाही का?" जीआर कधी खोटे बोलेल का? कर्तृत्वशून्य व्यक्ती म्हणजे उद्धव ठाकरे, खोटे बोल पण रेटून बोल म्हणजे म्हणजे उद्धव ठाकरे असा जोरदार हल्ला त्यांनी उद्धव ठाकरेंवर चढवला.



**राज ठाकरेंना शिवसेनेत छळले**

राज ठाकरे शिवसेना पक्षात असताना उद्धव ठाकरेंनी त्यांना खूप छळले होते, शिवसेना सोडण्याची त्यांची इच्छा नव्हती मात्र उद्धव ठाकरेंनी त्यांना प्रवृत्त केले, कुटुंब म्हणून किती जणांना उद्धव ठाकरेंनी जवळ केले हे सांगावे? ज्या मराठी माणसाने शिवसेनेला ताकद दिली त्याच मराठी माणसाची वाट उद्धव ठाकरेंनी लावली. ४० वर्षांत बाळासाहेबांनी शिवसेना उभारली. पण तीच शिवसेना अडीच वर्षांत उद्धव ठाकरेंनी संपवली असा आरोप नारायण राणे यांनी केला.

**कोण भरत गोगावले? :** मंत्री भरत गोगावले यांनी केलेल्या आरोपांबद्दल पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर कोण भरत गोगावले मी ओळखत नाही, असे सणसणीत उत्तर राणे यांनी यावेळी दिले.



राज्याचे माजी मुख्यमंत्री, विद्यमान खासदार नारायण राणे आणि कॅबिनेट मंत्री नितेश राणे या दोघांचे विधान भवनात एकत्र जात असतानांचे छायाचित्र...

## वेचक

### 'धनुष्यबाणा'वर १४ जुलैला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**मुंबई :** भारतीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना जाहीर केली आणि त्यांना 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह देण्याचा निर्णय दिला होता. दरम्यान उबाठा गटाकडून या निर्णयाला आव्हान देत अंतरिम दिलासा मिळावा अशी मागणी करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दखाल करण्यात आली आहे. या ठाकरे गटाकडून दाखल केलेल्या याचिकेनंतर हे प्रकरण १४ जुलै रोजी सुचिबद्ध करण्याचे बुधवारी (२ जुलै) रोजी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे.

### दलाई लामा यांचा उत्तराधिकारी निवडणार



**धर्मशाळा :** तिबेटी धर्मगुरू १४ वे दलाई लामा (तेन्झिन ग्यात्सो) यांनी त्यांच्या उत्तराधिकाऱ्याच्या निवडीबाबत चीनच्या हस्तक्षेपाला ठामपणे विरोध दर्शवत, पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, त्यांच्या पुनर्जन्माची प्रक्रिया पारंपरिक तिबेटी बौद्ध पद्धतीनेच होणार आहे आणि याचा एकमेव अधिकार गदेन फोड्रंग ट्रस्टकडेच आहे. चीनच्या दाव्यांना थेट आव्हान देत ही घोषणा त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर केली.

### सोनिया - राहुल गांधींना ती संपत्ती लाटायची होती

**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणाची सुनावणी झाली. कॉंग्रेसला असोसिएटेड जर्नल्सची संपत्ती लाटायची होती. कॉंग्रेस नेते सोनिया आणि राहुल गांधी यांनीच ही २ हजार कोटींची मालमत्ता लाटण्याचे षडयंत्र रचले होते, असा दावा ईडीचे वकील एस. व्ही. राजू यांनी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात बुधवारी सुनावणीदरम्यान केला.



### ताजमहालाच्या गेटवर फायरिंग

**नवी दिल्ली :** ताजमहालाच्या पश्चिम गेट परिसरात असलेल्या पार्किंगजवळ यलो झोन बॅरिअर परिसरात सोमवारी फायरिंगची घटना घडली होती, ज्या व्यक्तीने फायरिंग केली तो भाजपाचा नेता असल्याची माहिती आता समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणात पंकज कुमार सिंह याला बेड्या ठोकल्या आहेत. पंकज सिंहने पोलिसांची नजर चुकवून पळ काढला होता.

# खासगी दुचाकींना बाईक टॅक्सी सेवा देता येणार

**केंद्र सरकारची परवानगी**

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

देशात प्रथमच केंद्र सरकारने खासगी वापरासाठी नोंदणीकृत दुचाकींना राईड-हेलिंग ॲग्रीगेटर प्लॅटफॉर्मवर बाईक टॅक्सी सेवा देण्याची परवानगी दिली आहे. यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने 'मोटार वाहन ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५' अधिसूचित केली असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संबंधित राज्य सरकारांची मान्यता आवश्यक राहणार आहे.

या निर्णयामुळे ओला, उबर, रॅपिडोसारख्या सेवा देणाऱ्या कंपन्यांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



यामुळे शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी स्वस्त व सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार असून, वाहतूक कोंडी व प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. तसेच लाखो रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

खासगी दुचाकीवर बाईक टॅक्सी चालविणाऱ्या चालकांसाठी पोलीस व्हेरिफिकेशन, वैद्यकीय तपासणी, विमा संरक्षण आणि प्रशिक्षण यासह कडक अटी लागू करण्यात आल्या आहेत. ॲग्रीगेटर कंपन्यांना नवीन परवाना घेण्यासाठी ५ लाख रुपये तर नूतनीकरणासाठी २५ हजार रुपये निश्चित करण्यात आले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना

**आफ्रिकन देशाचा पहिला द्विपक्षीय दौरा**

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत, या दरम्यान ते ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होतील आणि द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी घाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, अर्जेंटिना आणि नामिबियाच्या नेत्यांशी भेटी घेतील. पंतप्रधान मोदी त्यांच्या पाच देशांच्या दौऱ्याची सुरुवात घाना येथून करतील. पंतप्रधानांचा हा आफ्रिकन देशाचा पहिला द्विपक्षीय दौरा असेल.



या भेटीदरम्यान, पंतप्रधान घानाच्या राष्ट्रपतींशी चर्चा करून मजबूत द्विपक्षीय भागीदारीचा आढावा घेतील आणि आर्थिक, ऊर्जा आणि संरक्षण सहकार्य आणि विकास सहकार्य भागीदारीद्वारे ती वाढवण्याच्या पुढील मार्गांवर चर्चा करतील. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील, असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. भारताच्या पंतप्रधानांचा घाना दौरा तीन दशकांनंतर होत आहे.

पंतप्रधान मोदी त्यांच्या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात, ५ ते ८ जुलै दरम्यान १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझीलला जातील आणि त्यानंतर दक्षिण अमेरिकन देशाला राज्य भेट देतील. पंतप्रधान मोदींचा हा ब्राझीलचा चौथा दौरा असेल.

१७ वी ब्रिक्स नेत्यांची शिखर परिषद रिओ दि जानेरो येथे होणार आहे. पंतप्रधान शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर अनेक द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे. त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान मोदी ३-४ जुलै दरम्यान त्रिनिदाद आणि टोबॅगो ला अधिकृत भेट देतील.

# तृतीय पंथीयांनाही एसटीत ५० टक्के सवलत

**मुंबई (प्रतिनिधी) :** महिलांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर आता राज्यातील तृतीय पंथीयांनाही एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत मिळणार आहे. तृतीय पंथीयांना एसटीत प्रवासात सवलत देण्यासाठी एसटी महामंडळाच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करण्यात येईल. त्यानंतर महिलांसह तृतीय पंथीयांनाही एसटीत ५० टक्के सवलतीत प्रवास करता येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. परिवहन विभागाच्या या निर्णयामुळे २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील चार लाख तृतीय पंथीयांना दिलासा मिळणार आहे.

**महामंडळाच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करणार**

कर्नाटकात महिलांसाठी असणारे मोफत बस प्रवास सेवा योजना यामध्ये तृतीयपंथी घटकांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत राज्यातील महिलांना एसटी बस प्रवासात महिलांसाठी ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. ही बाब अत्यंत स्वागतार्ह आहे. राज्यातील तृतीयपंथी घटकही आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून समाजातील मुख्य प्रवाहाशी जोडले जाण्यासाठी आणि स्वावलंबी जीवन जगण्यासाठी प्रयत्नशील आहे.

तृतीय पंथीयांनाही ५० टक्के सवलत देण्यात यावी, अशी मागणी परिवहन मंत्र्यांकडे केल्याचे तृतीयपंथी मंडळ उपाध्यक्ष सान्वी जेठवाणी यांनी सांगितले.

# साई मंदिरात करोडोंच्या श्रद्धेवर दरोडा!

## भाविकाची दोन लाखांची पर्स मंदिरातच साफ



◆ शिर्डी (प्रतिनिधी) :

जगभरातील कोट्यवधी साईभक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या शिर्डीच्या साई मंदिरात चोरट्यांचा उच्छाद सुरू असल्याचे गंभीर वास्तव पुन्हा समोर आले आहे. राजस्थानमधील भिवाडी येथून दर्शनासाठी आलेल्या साईभक्त मंजू सचदेव यांच्या बहिणीची दोन लाख रुपयांची रक्कम असलेली पर्स चक्क साई मंदिरात चोरीला गेली असून याबाबत भाविकांनी शिर्डी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

मंजू सचदेव या आपल्या बहिणी किरण सुनील ग्रोवर आणि पुजारी श्यामसुंदर यांच्यासोबत १९ जून २०२५ रोजी सकाळी ८.४५ वाजता साई दर्शनासाठी मंदिरात दाखल झाल्या. त्यावेळी किरण ग्रोवर यांच्या हाताशी असलेल्या काळ्या पर्समध्ये दोन लाख रुपयांची रोख रक्कम होती. दर्शनानंतर मंदिराच्या चार नंबर गेटजवळील लाडू काउंटरवर गेल्यावर पर्स उघडली असता ती रिकामी आढळली.

पर्स नीट पाहिली असता, खालून ती धारदार वस्तूने कापल्याचे आढळले. सीसीटीव्हीत एक महिला पर्समधून पैसे काढून खिशात टाकत असल्याचे दिसून येते. या प्रकरणी शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# माजी आमदार अपूर्व हिरे भाजपात



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

**इंदापूरच्या प्रवीण मानेंनीही सोडली साथ**

राज्याच्या राजकारणात अनेक नेते आगामी निवडणुकांच्या आनुषंगाने मोठ्या प्रमाणावर पक्षांतर करत असल्याचे दिसून येत आहे. अशातच आज भाजपामध्ये काही बडे नेते पक्षांतर करणार असल्याची माहिती समोर आली होती. त्यानुसार माजी शिक्षक आमदार अपूर्व हिरेंनी भाजपात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी पक्षाचे इंदापूरचे प्रवीण माने यांनी सुद्धा भाजपात प्रवेश केला आहे. त्याचबरोबर राजू शेट्टी यांचे जवळचे सहकारी आणि शेतकरी नेते सावकार मादनाईक भाजपात गेले आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी आमदार आणि प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अपूर्व हिरे यांच्या भारतीय जनता पक्षात प्रवेशाबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चांना उधाण आले होते. बुधवारी डॉ. अपूर्व हिरे यांनी मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात शेकडो समर्थकांसह अधिकृत पक्षप्रवेश केला आहे. भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत डॉ. अपूर्व हिरे यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील देखील उपस्थित होते. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण व शहरी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपामध्ये प्रवेश करत असल्याचे डॉ. हिरे यांनी सांगितले होते. ग्रामीण आणि शहरी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव तसेच भाजपाच्या विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे हा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

शरद पवार यांचे एकेकाळचे कट्टर समर्थक पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश झाला आहे. इंदापूरच्या राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिकेत असणाऱ्या मानेंनी भाजपात प्रवेश केल्याने तालुक्यातील पक्षाला मोठा चेहरा मिळाला आहे.

# जीएसटीत घट, अर्थमंत्र्यांचे सूतोवाच



◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

सामान्य माणसाच्या डोक्यावरील कराचा बोजा कमी करण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जाणार असून केंद्र सरकार मध्यम आणि निम्न मध्यम वर्गीयांच्या रोजच्या वापरातील वस्तूंवरील जीएसटी कमी करू इच्छिते. जीएसटीच्या पुनर्रचनेत वस्तूंवरील १२ टक्के कर ५ टक्क्यांवर येऊ शकतो, असे सूतोवाच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केले आहे.

जीएसटी परिषदेची बैठक लवकरच होणार असून यात जीएसटीच्या दर पुनर्रचनेकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. इंग्रजी वृत्तपत्राला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यात त्यांनी जीएसटी कमी होणार असल्याचे सांगितले.

**तूप, साबण आणि स्नॅक्स होणार स्वस्त? :** येत्या काही दिवसांत तूप, साबण, स्नॅक्ससारख्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचे दर मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर (GST) स्लॅब पुनर्रचनेचा गंभीरपणे विचार सुरू केला आहे. यामध्ये जीवनावश्यक वस्तूंवरील १२% जीएसटी स्लॅब ५% वर आणण्याचा किंवा १२% स्लॅबच रद्द करण्याचा प्रस्ताव चर्चेत आहे, अशी माहिती समोर येत आहे. सध्या १२% कर लागू असलेल्या अनेक वस्तू या मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटांसाठी अत्यावश्यक आहेत. या स्लॅबमध्ये तूप, विविध प्रकारचे स्नॅक्स, साबण, टूथपेस्ट, डिटर्जंट आणि काही डबाबंद अन्नपदार्थांचा समावेश आहे. या दरकपातीनंतर ग्राहकांना हे सर्व उत्पादन अधिक स्वस्त दरात मिळण्याची शक्यता आहे.

# शेख हसीना यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने एका अवमान प्रकरणात शेख हसीना यांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली आहे. बांगलादेशमधील क्राइम ट्रिब्युनलचे न्यायमूर्ती मोहम्मद गुलाम मुर्तुझा मोझुमदार यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने शेख हसीना यांना ही शिक्षा सुनावली आहे.

गैबांधामधील गोविंदगंजच्या रहिवासी शकील अकंद बुलबूल यांना देखील याच प्रकरणात दोन महिने तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बुलबूल या आवामी लीगच्या विद्यार्थी शाखेशी म्हणजेच बांगलादेश छात्र लीगशी संबंधित आहेत. हा अवमान खटला शकील अकंद बुलबूल यांच्याशी झालेल्या कथित फोनकॉलशी संबंधित आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये शेख हसीना यांचाच आवाज असल्याचा दावा करण्यात आला होता. या कथित कॉलमध्ये शेख हसीना नावाची व्यक्ती म्हणत होती की "माझ्याविरोधात २२७ खटले चालू आहेत. त्यामुळे मला २२७ जणांना ठार मारण्याचा परवाना मिळाला आहे."



या प्रकरणी सरकारी वकिलांनी ट्रिब्युनलसमोर असा युक्तिवाद केला की, "हे वक्तव्य न्यायालयाचा अवमान करणारे आहे. कारण, अशा वक्तव्यांमुळे न्यायालयीन प्रक्रियेला धोका निर्माण झाला होता. हा देशातील मोठ्या उठावाशी संबंधित चालू असलेल्या खटल्यांमध्ये सहभागी असलेल्या लोकांना, आंदोलकांना धमकावण्याचा प्रकार होता. हा न्यायालयाचा अवमान आहे. या ऑडिओ क्लिपमुळे न्यायालयीन प्रक्रियेला धोका निर्माण झाला होता. हा देशातील उठावाशी संबंधित खटल्यांमध्ये सहभागी लोकांना धमकावण्याचा प्रकार होता."

बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना या गेल्या वर्षी देश सोडून पळून गेल्या आणि त्यांनी भारतात आश्रय घेतला आहे. बांगलादेश सोडल्यानंतर पहिल्यांदाच त्यांच्यावर अशा प्रकारे न्यायालयीन कारवाई झाली आहे. पहिल्यांदाच एखाद्या प्रकरणात न्यायालयाने त्यांना शिक्षा सुनावली आहे.



**सोन्याचा भाव**

२४ कॅरेट प्रति तोळा ९८८८० रुपये

२२ कॅरेट प्रति तोळा ९०६५० रुपये



**चांदीचा भाव**

प्रति किलो १,१०,००० रुपये



बुधवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात अखेरच्या सत्रात बाजारात घसरण झाली होती. बाजारातील डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ मुद्द्यांवर बाजारातील पडझड कायम राहत निर्देशांकात घसरण झाली. सेन्सेक्स २८७.६० अंकानी घसरत ८३४०९.६९ पातळीवर दिवसाअखेरीस स्थिरावला असून निफ्टी ५०, ८८.४० अंकानी घसरत २५४५३.४० पातळीवर स्थिरावला आहे.

**कमी दाबाचा पट्टा मध्य प्रदेशाकडे सरकल्याने होणार परिणाम**

# राज्यात पुढील ४८ तासांत पावसाचा जोर वाढणार



◆ मुंबई (वृत्तसंस्था) :

जून महिन्यात सर्वाधिक पडलेला मोसमी पाऊस पुन्हा एकदा सक्रिय झाला असून, मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः येत्या ४८ तासांत ९० ते १२० मिमी इतक्या पावसाची नोंद होऊ शकते, असा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण भारतात स्थित असलेला कमी दाबाचा पट्टा मध्य प्रदेशाच्या सीमेकडे सरकत असून त्यामुळे या प्रणालीचा कोकण किनारपट्टीवर परिणाम होत आहे. या हवामान बदलामुळे वाऱ्याचा जोरही वाढण्याची शक्यता आहे. परिणामी, मुसळधार पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः मुंबईच्या उत्तर उपनगरांमधील बोरिवली, कांदिवली, दहिसर, मालाड या भागात तुलनेने अधिक पावसाची शक्यता आहे, तर दक्षिण मुंबईत पावसाचा जोर तुलनेत कमी असेल. दरम्यान, पालघर जिल्हा आणि पश्चिम घाटमाथा भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**जुलैमध्ये राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस**

जून महिन्यात देशात सरासरी ओलांडणाऱ्या पावसाचा जोर जुलै महिन्यात कायमच राहण्याची शक्यता आहे. यंदाच्या जुलै महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के. एस. होसळीकर यांनी व्यक्त केली. देशात १०६% पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रात सर्वदूर चांगल्या पावसाचे संकेत असल्याने राज्यभर सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. ५ जुलैनंतर राज्यात पाऊस सक्रिय होणार आहे.

# विरोधक अभ्यासू हवेत...

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही. शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते. या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? ङ्गखाली डोकं वर पाय...फ माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे. लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते. विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले. ङ्गनेमेचि येतो पावसाळाफ याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदाराने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# प्रदेशाध्यक्षपदी कोकणपुत्र भाजपायी...!

महाराष्ट्र प्रदेश भाजपाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे कोकणचे सुपुत्र, माजी मंत्री आ. रवींद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. निवड झाल्यानंतर, 'माझी आज या पदावर निवड झाली आहे. खरेतर भाजपाने मला हे पद देऊन माझ्यावर उपकार केले. माझी ओळख ही भारतीय जनता पार्टी आहे. मी २००२ साली पक्षाच्या कामाला सुरुवात केली. तिथून काम करत एक सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता, भाजपाचा अध्यक्ष होतो, हे कुठल्याच पक्षात होणार नाही. त्यामुळे हे माझ्यावर उपकार आहेत. भारतीय जनता पार्टीची राष्ट्रवादाची विचारधारा तसेच मोदी सरकारचे लोकोपयोगी निर्णय राज्याच्या कानाकोपऱ्यांत जाऊन सामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांच्या साथीने पार पाडेन,' असे ते म्हणाले. तर भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या रूपाने तळागाळातील हाडाचा कार्यकर्ता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे. भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपामध्येच शक्य आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचे कौतुक केले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण हे कोकणचे सुपुत्र आहेत. मात्र, त्यांचे कार्यक्षेत्र मुंबई-डोंबिवली आहे. आ. रवींद्र चव्हाण यांची प्रदेशाध्यक्षपदावरची निवड जरी अपेक्षित मानली गेली तरीही आ. रवींद्र चव्हाण यांचे गेल्या काही वर्षांतील भारतीय जनता पक्षाचा 'कार्यकर्ता' म्हणून असलेलं कार्यच त्यांना प्रदेशाध्यक्षपदापर्यंत घेऊन गेले आहे. भारतीय जनता पक्षाच्या पक्षीय कार्यामध्ये आ. रवींद्र चव्हाण युवामोर्चापासून कार्यरत होते. पक्षीय स्तरावर प्रदेश भाजपाचे महामंत्री म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम पाहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेत वाढलेल्या आ. रवींद्र चव्हाण यांनी नेहमीच पक्षाला अग्रस्थानी ठेऊन काम केले. भाजपा युवा मोर्चा, प्रदेश महामंत्री या पदांवर काम करताना आ. रवींद्र चव्हाण यांनी पक्षीय काम करताना भाजपा कसा वाढेल यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे साहजिकच कोकणातील एक व्यक्ती मुंबईत जाऊन स्थिरावतो. निव्वळ स्थिरावतोच असं नाही तर मुंबईतील डोंबिवली भागात डोंबिवलीकरांना सोबत घेत डोंबिवली-कल्याण महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम केले. पक्षीय कामामुळे डोंबिवलीतील नागरिकांशी संवाद होताच. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून विकासकामात सहभाग घेण्याची त्यांना संधी मिळाली. त्यानंतर आ. रवींद्र चव्हाण यांना डोंबिवलीचे आमदार होण्याची संधी मिळाली. महायुतीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांना संधी दिली गेली. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून संधी मिळाली तेव्हा त्यांनी कोकणसाठीही निधी उपलब्ध करून दिला. मागील सहा महिन्यांपूर्वीपासून आ. रवींद्र चव्हाण यांना नव्याने स्थापित झालेल्या महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नव्हते. त्याचवेळी प्रदेशाध्यक्ष पदांवर आ. रवींद्र चव्हाण यांच्या नावाची चर्चा सुरू झाली होती. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदावर महाराष्ट्राचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे कार्यरत असताना महाराष्ट्र प्रदेश भाजपा कार्याध्यक्ष पदाची सूत्र आ. रवींद्र चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आली. भाजपाच्या प्रदेशांच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर निवड प्रक्रियेत प्रदेशाध्यक्षपदांसाठी आ. रवींद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला त्याचवेळी गेली सहा महिने प्रदेशाध्यक्षपदावर आ. रवींद्र चव्हाण यांच्या निवडीच्या चर्चेला खऱ्याअर्थाने पूर्णविराम मिळाला. नेहमीच पक्षीय कामाची आवड असणाऱ्या आ. रवींद्र चव्हाण हे पक्ष वाढविण्यासाठी निश्चितच प्रयत्न करतील. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदी स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका दिवाळीदरम्यानच्या कालावधीत होण्याची शक्यता गृहीत धरूनच महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष स्वतःच्या पक्षाची रेषा मोठी करण्याच्या प्रयत्नाला लागले आहेत. महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार गट, आरपीआय रामदास आठवले गट अशा चार मित्रपक्षांची मिळून महायुती आहे. तर राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पावर गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट या चार पक्षांची महाविकास आघाडी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात महायुती व महाविकास आघाडीचं राजकारण आहे. या महायुतीमध्ये राज्यात आपापल्या पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करीत आहेत. महाविकास आघाडीत कोणाचा ताळमेळ कोणातच नाही अशीच काहीशी महाराष्ट्रात आणि कोकण भागात ही स्थिती आहे. महाविकास आघाडीतील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्यासाठी प्रयत्नशील आहे तशी स्वबळाची चर्चाही राज्यात सुरू झाली आहे. अर्थात आजच्या घडीला कोकणाच्या राजकारणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधात आहेत. मराठीच्या मुद्द्याआडून कोकणातील काही तालुका शहरामध्ये मनसे आणि उद्धव ठाकरे सेनेने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यातूनही महाविकास आघाडीला कोणताही राजकीय फायदा होणार नाही. कोकणातील राजकारण हे सध्या तरी महायुती भोवतीच फिरणारे आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर भाजपाचा प्रदेशाध्यक्ष कोण होणार याची चर्चा सुरू होती. मंत्रिमंडळ विस्तारात रवींद्र चव्हाण यांना स्थान देण्यात न आल्याने त्यांच्याच नावाची शक्यता अधिक होती. अखेर भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू, माजी मंत्री आणि विद्यमान प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली अन् रवींद्र चव्हाण हे भाजपाचे १२वे प्रदेशाध्यक्ष ठरले...



**माझे कोकण**

**संतोष वायंगणकर**

महाराष्ट्रात नजीकच्या काळात होऊ घातलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका अशा स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी एका कोकणच्या सुपुत्रावर सोपविण्यात आली आहे. फार भाष्य न करणे, मनातील कोणतेही मनसुबे चेहऱ्यावर उमटू न देता निर्विकार चेहऱ्याने त्यांचा असलेला सर्वत्रचा वावर, आ. रवींद्र चव्हाण यांच्या मनात नेमकं काय चाललंय याबद्दल चेहऱ्यावर पुसटशीही एक रेषाही उमटू न देता धीरगंभिरतेने राजकारण करण्याचा त्यांचा स्वभाव दिसतो. शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजितदादा पवार राष्ट्रवादी गट अशा दोन मित्र पक्षांना सोबत घेत प्रदेशाची राजकीय पक्षीय रणनिती आखण्याची मोठी जबाबदारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांच्यावर आहे. अर्थात भारतीय जनता पक्षामध्ये असलेल्या कोअर कमिटी सर्व रणनिती निश्चित केल्यावर त्यावर शिक्कामोर्तब केला जातो असे म्हटले जाते. महायुतीतील सर्वच मित्रपक्ष पक्षीय वाढविण्यासाठी आपापल्या पद्धतीने प्रयत्न करत असताना शतप्रतिशत भाजपा हा भाजपाचा अजेंडा फार पूर्वीपासूनचा आहे. कोकणात भाजपाबरोबरच एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही आपली ताकद वाढविण्याच्या कामाला लागली आहे. कोकणात सर्वच राजकीय पक्षांना अस्तित्व टिकवून ठेवणं आणि आपलं वर्चस्व नव्हे तर प्राबल्य दाखविण्याचा प्रयत्न सर्वांनाच करावयाचा आहे. स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा जवळ येतील तशीच त्याची अधिक गती वाढणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष पदावर कोकणच्या एका सुपुत्राची वर्णी लागली आहे. आ. रवींद्र चव्हाण मित्रपक्षांना सोबत घेत महाराष्ट्राच राजकारण कशा पद्धतीने करतात हे पाहणं फार औत्स्युक्याचं ठरेल.

# दुबार पेरणीचे संकट टळले...

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात सर्वसाधारण ४९ लाख ७२ हजार ७२८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेच २४ लाख ४५ हजार ९४९ हेक्टरवर म्हणजेच ४९.१९ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी मराठवाड्यातील जे क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले, त्यामध्ये नांदेड जिल्ह्यासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ६ लाख ८१ हजार ९०३ हेक्टर, जालन्यातील ६ लाख ५१ हजार १७३ हेक्टर, बीडमधील ८ लाख ८ हजार ९४५ हेक्टर, लातूरमधील ५ लाख ८६ हजार १०१ हेक्टर, धाराशिवमधील ५ लाख ५४ हजार ३६० हेक्टर, परभणीतील ५ लाख ४ हजार ६८ हेक्टर, हिंगोलीतील ४ लाख १० हजार ३९८ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. त्यापैकी २४ लाख ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या क्षेत्रामध्ये नांदेड जिल्ह्यात ४,८५,२८० हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ३,९४,९४९ हेक्टर, जालन्यातील १,९७,६६४ हेक्टर, बीडमधील १,९१,९०८ हेक्टर, लातूरमधील ४,३५,००१ हेक्टर, धाराशीवमधील ४,०६,०६६ हेक्टर, परभणीतील २,५५,७३७ हेक्टर व हिंगोलीमधील सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत ७९ हजार ३११, हेक्टर क्षेत्रावरील पेरणीचा समावेश आहे. मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे पिके तरली आहेत. आता शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काही ठिकाणी रिमझिम पाऊस झाला, त्यामुळे कोवळ्या पिकाला देखील जीवदान मिळाले आहे.

**'दुबार'चे संकट टळले**

मराठवाडा व विदर्भात पाऊस नसल्याने बळीराजा संकटात सापडला होता. मराठवाड्यात तर कडक उन्हाळा असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात दुबार पेरणीची भीती व्यक्त केली जात होती; परंतु अखेर निसर्गाने तारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात २ दिवसांपूर्वी चांगलाच पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील ३९ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने दुबार पेरणीचे संकट तूर्त तरी टळले आहे. नांदेड जिल्ह्यातील ६ तालुक्यात चांगलाच पाऊस झाला. त्यामुळे बिलोली, कुंडलवाडी, हदगाव, नांदेड, भाकर, किनवट, माहूर या भागात शेतकऱ्यांना आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यात परिस्थिती अजूनही कठीणच आहे. अशीच परिस्थिती हिंगोली व परभणी जिल्ह्यातही निर्माण झाली आहे. पाऊस नसला तर शेतकरी राजा परेशान होतो. मराठवाड्यात तसेच विदर्भात पाऊस परतल्याने आनंदी-आनंद व्यक्त केला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील दहेली मंडळात एकाच दिवसात १४७ मिलिलिटर पाऊस झाला. आणखी तीन दिवस मराठवाड्यात चांगला पाऊस राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विदर्भातील यवतमाळ, वाशिम तसेच बुलढाणा भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. विदर्भातील या तीन जिल्ह्यांतील अनेक मार्ग ठप्प झाले आहेत. वर्धा जिल्ह्यात तर वीज पडल्याने दोन भावंडांचा जागीच मृत्यू झाला. मराठवाड्यात दीर्घ खंडानंतर पावसाचे पुनरागमन झाले आहे. सर्वदूर मध्यम स्वरूपातील पाऊस सुरू असून आणखी दमदार पाऊस झाला तर उरलेल्या भागालाही दिलासा मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, फुलंब्री, वैजापूर या भागातही चांगलाच पाऊस झाला. हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी, औंढा नागनाथ, जिंतूर या ठिकाणी पावसाने चांगलीच हजेरी लावली. त्यामुळे या तीन भागातील दुबार पेरणी टळली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात दमदार पाऊस झाला. त्याठिकाणी देखील आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. शेतकरी पाऊस नसल्यामुळे आकाशाकडे डोळे लावून बसला होता. अनेक ठिकाणी बियाणेच बोगस निघाल्यामुळे पेरणी करूनही पिकाची उगवण झाली नाही.

**मराठवाडा वार्तापत्र**

मराठवाड्यात मूग, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तूर, उडीद आदी पिके प्रामुख्याने घेतली जातात. सध्याही यापैकी सोयाबीनचे पीक घेण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात मात्र पावसाने हात आखडता घेतला आहे. ८ दिवसांपासून त्या ठिकाणी पावसाचा खंड पडला आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत मे महिन्यात पाऊस झाला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मशागत करायलाही पूर्व मोसमी पावसाने निट संधी दिली नाही. मात्र शेतकऱ्यांनी त्यानंतर पेरणीयोग्य मशागत केली.

बीड जिल्ह्यात या महिन्यात १ जूनपासून सरासरी ५० टक्के पाऊस पडला. बीड जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ८ लाख ८ हजार हेक्टर आहेत. मात्र या तुलनेत साडेपाच लाखांच्या जवळपास पेरणी झाली. बीड जिल्ह्यात ६८ टक्के पेरणी उरकली आहे. नांदेड जिल्ह्यात ५ लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. खरीप हंगामासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले. त्यापैकी ४ लाख ८५ हजार २८० हेक्टरवर पेरणी झाली आहे.

**- अभयकुमार दांडगे**



गेल्या दहा वर्षांत पावसाचे कोणतेही वेळापत्रक राहिलेले नाही. अतिवृष्टी, अवर्षणासारख्या प्रकाराबरोबरच पाऊस पडला तर सलग पडणे, गायब झाला तर सलग वीस वीस दिवस गायब होणे असे प्रकार होत असल्याने पर्यावरणातील बदल व अनिश्चितता लक्षात घेऊन मगच शेतीच्या कामाचे नवीन वेळापत्रक शेतकऱ्यांनी बनवणे गरजेचे आहे. मराठवाड्यात तर कडक उन्हाळा असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात दुबार पेरणीची भीती व्यक्त केली जात होती; परंतु अखेर निसर्गाने तारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात २ दिवसांपूर्वी चांगलाच पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील ३९ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने दुबार पेरणीचे संकट तूर्त तरी टळले आहे.

## राशिभविष्य

गुरुवार, ३ जुलै २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती आषाढ शुद्ध अष्टमी शके १९४७, चंद्र नक्षत्र हस्त योग परिघ चंद्र राशी कन्या, भारतीय सौर १२ आषाढ शके १९४७, गुरुवार दि. ३ जुलै २०२५, मुंबईचा सूर्योदय ६.०४, मुंबईचा सूर्यास्त ७.२०, मुंबईचा चंद्रोदय १.०३, मुंबईचा चंद्रास्त ००.५३, उद्याची राहू काळ २.२१ ते ४.०१, दुर्गाष्टमी, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष :** मानसिक स्वास्थ्य लाभणार आहे.

**वृषभ :** व्यापार व्यवसायातील यश आपणास प्रगतिपथावर नेणार आहे.

**मिथुन :** सहल किंवा मनोरंजनाचे कार्यक्रम आखणार आहात.

**कर्क :** महत्त्वाची कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न कराल.

**सिंह :** धार्मिक कार्यक्रमानिमित्त प्रवास करण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आपली निर्णय क्षमता कमी होण्याची शक्यता दिसते आहे.

**तूळ :** दिवस आपणास चांगला जाईल.

**वृश्चिक :** विचारपूर्वक कामे करा.

**धनू :** व्यवसायात चांगला जम बसणार आहे.

**मकर :** घरच्यांची संवाद साधण्याचा प्रयत्न कराल.

**कुंभ :** नवीन संधी प्राप्त होतील.

**मीन :** आपल्याला आत्मिक बल वाढणार आहे.

पान सहा वरुन

### लोणारमध्ये बेताल

वाचाळवीरांना भाजपने त्वरित निलंबित करावे, अशी मागणीही यावेळी केली यावेळी काँग्रेस पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष राजेश मापारी, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शांतीलाल भाऊ गुगलीया, माजी जिल्हा सरचिटणीस साहेबराव पाटोळे,ज्येष्ठ नेते प्रकाश धुमाळ, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात,माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव फुके, ज्येष्ठ नेते प्रदीप संचेती, अल्पसंख्यांक सेल तालुका अध्यक्ष तोफिक कुरेशी, माजी नगरसेवक पंढरी चाटे, माजी नगरसेवक शेख रहुपं शेख महबूब,माजी नगरसेवक शेख करामत शेख गुलाब, माजी नगरसेवक संतोष मापारी, माजी नगरसेवक अरुण जावळे, शहर उपाध्यक्ष रामचंद्र कोचर, माजी नगरसेवक सतीश राठोड,युवा काँग्रेस तालुका अध्यक्ष अमोल सोनवणे, शहराध्यक्ष विकास मोरे, शेख अफसर शेख तुराब, एजाज खान, मनीष पाटोळे, शुभम चाटे, पवन सोनवणे, सुदर्शन जायभाय, गजानन तिडके, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### बँकेच्या मॅनेजरला

शेतकर्यांना न्याय मिळवून दिल्याने शेतकर्यांनी आनंद व्यक्त केला आहे. गेवराई तालुक्यातील राष्ट्रीयीकृत बँकेने थकीत कर्ज असलेल्या शेतकर्यांच्या खात्याला होल्ड लावण्याने, शेतकर्यांना इतर शासकीय अनुदानाचे पैसे मिळत नव्हते. या संदर्भात, शेतकर्यांनी शिवसेनेचे तालुका प्रमुख अजय भैय्या दाभाडे यांच्याशी संपर्क साधून, बॅन्केच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेली अडवणूक लक्षात आणून दिली होती. दरम्यान , मंत्री बबनराव लोणीकर यांच्या फोटोला जोडे मारून, त्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला. या आंदोलनात नानासाहेब पवार, प्रशांत बजगुडे, नारायण बजगुडे, बाळू बजगुडे, बाबु जाधव, गणेश जवरे, गणेश डेंगळे, किरण धापसे, इलियास शेख यांच्या सह हजारो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

### अनेक वर्षांपासूनचा

गाची ३.०६ एकर जागा आहे. त्यापैकी ०.७५ हे.आर. जागा पशुसंवर्धन विभागाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनुसार नवीन तालुका पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त या कार्यालयासाठी स्वतंत्र मजला प्रस्तावित बांधकामांमध्ये समाविष्ट करावा, उर्वरित जागा पशुसंवर्धन विभागाकडे ठेवावी असा निर्णय बैठकीत झाला.गडहिंग्लज हे उपविभागीय कार्यालय असलेले शहर आहे. या ठिकाणी प्रांत कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, सहकार, कृषी इत्यादी कार्यालय आहेत आणि ती सर्व भाड्याच्या जागेत आहेत. नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध नव्हती. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ती आता पशुसंवर्धन विभागाने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कार्यालयासाठी एकत्र प्रशासकीय इमारत बांधणे शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

### परळीतील नामांतर

पुरस्कार २०२५: देऊन गौरव करण्यात आला.यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष रिपाइंचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे यांनी आर.डी.व्हावळे यांच्या सोबत नामांतर लढ्यात भोगलेल्या जेल मधील आठवणी जाग्या केल्या. सामाजिक कार्याबरोबर ते अष्टपैलू कबड्डी खेळाडू असल्याचेही सांगितले.यावेळी प्रा.दासू वाघमारे यांनी एकमेकांवर टिका न करता आंबेडकरी विचार आणि प्रचारासाठी काम करण्याचे आवाहन केले.तर मिलिंद घाडगे यांनी कार्यकर्त्यांत स्वार्थ वाढल्याने चळवळीला धोका निर्माण झाला आहे सांगितले.तर अजय गंडले यांनी ज्या काळात समाजाची विदारक स्थिती होती त्या काळात पँथर आर.डी.व्हावळे यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण असल्याचे सांगितले. जेष्ठ साहित्यिक व पत्रकार रानबा गायकवाड यांनी आज आम्ही जे आहोत ते जुन्या पिढीच्या योगदान व त्यागामुळेच असल्याचे प्रतिपादन केले.कार्यक्रमास विठ्ठलराव झिलमेवाड, बालाजी आंबाड,सुनील चिकाटे,माजी मुख्याध्यापक सुरेश रोडे , भैय्यासाहेब आदोडे,आकाश व्हावळे, एड. गोलेर, विकास व्हावळे, यशपाल मुंडे, राहुल गोदाम, रमेश रायभोळे, मोहन व्हावळे, भगवान साकसमुद्रे,नितीन ढाकणे, नाना सरवदे, विद्याधर शिरसाट,संपूर्ण व्हावळे परिवार, जयश्री शिरसाट, यांच्यासह यशोधरा महिला मंडळ भीमवाडी, अरविंद धिवार, किशोर धिवार, रणवीर व्हावळे, नागेश्वर खंदारे, संघपाल व्हावळे, रणजित सरवदे यांचेसह महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि मानपत्र वाचन रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी केले.पुरस्कार मुतींचा परिचय विधीज्ञ दिलीप उजगरे यांनी दिला. सूत्रसंचालन नवनाथ दाने यांनी तर आभारप्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे यांनी केले.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे प्रा.बी. एम.खरात, गोविंदराव सोनवणे,जीवनराव घाडगे, बा. सो. कांबळे,विकास वाघमारे,ब्रिजेश इंगळे, आदींनी परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक मुद्रक मालक संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com




## नवीन सयाबाई पाटील ज्येष्ठ कट्ट्याचे उद्घाटन

**कळवा :** प्रभाग ९ मधील खारीगांव येथील पंचरत्नद्वार येथे स्वर्गीय सयाबाई काशिनाथ पाटील ज्येष्ठ कट्टा या नवीन ज्येष्ठ कट्टयाचे मा. नगरसेवक उमेश पाटील यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. या उदघाटनप्रसंगी कळवा उपशहरप्रमुख राकेश पाटील, खारीगांव शाखाप्रमुख राधेय वराडकर, बबल्या पाटील, सहसंघटक रचना पाटील, महिला आघाडी अर्चना पाटील,शाखा संघटक निर्मला कदम, उपशाखा संघटक रेखा रहाटे, स्मिता आयरे, प्रियांका भरम, रेश्मा दळवी उपस्थित होते. राजपूत समाज सेवा संघाचे अध्यक्ष आर.के.पाटील, एम.एच.हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक आर.जे. राजपूत,डोंबिवली मंडळाचे अध्यक्ष महेंद्रसिंग राजपूत, सचिव नरेंद्र पाटील, कोषाध्यक्ष राजेंद्र पाटील,महिला प्रमुख आशाताई राजपूत, कार्यकारिणी सदस्य, युवानेते प्रमुख महेंद्रसिंग साळुंखे, युवा कार्यकर्ते गुलाब जाधव, संदीप पाटील, प्रशांत पाटील, शिवाजी सर, प्रवीण पाटील, स्वप्नील पाटील, बाळूदादा, नारायण पाटील, लालसिंग पाटील, छोटू टेलर आदी मान्यवर उपस्थित होते.

# काळू धरणातील विस्थापितांचे पुनर्वसन खापरी गावात नको

## स्थानिक ग्रामस्थांचे मुरबाड तहसीलदारांना निवेदन

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी तालुक्यातील काळू नदीवरील प्रस्तावित धरणग्रस्तांचे पुनर्वसन खापरी गावात नको अशी भूमिका खापरी ग्रामस्थांनी घेतली असून शासनाच्या या निर्णयावर आक्षेप घेत त्यांनी तहसिलदार यांना निवेदन दिले आहे.

मुरबाड, शहापूर तालुक्यातील खेडोपाड्यांसह दुर्गम भागातील वस्ती आजही पाण्यावाचून वंचित असून धरण उशाला तर कोरड घश्याला अशी जनतेची परिस्थिती झाली आहे. कोट्यावधींच्या जलजीवन मिशन योजनाही ठेकेदारांच्या घश्यात गेल्या असून प्रस्तावित काळू धरणाचा फायदा धनदांडगे आणि शहरांना होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. धरणाचा फायदा शहरांची तहान भागवण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांचा बळी घेतला जातो. कोयना, बारवी, तानसा, भातसा,



ही धरण बांधून मुंबईकर पाणी पित आहेत. मात्र ज्यांच्यावर अन्याय झाला ते चाळीस पन्नास वर्ष न्यायासाठी झगडत आहेत. आता असाच घाट मुरबाड तालुक्यात काळु धरण बांधण्याचा घातला जात आहे. धरण परिसरातील गावे उध्वस्त होणारच आहेत. परंतू त्यांचे पूनर्वसन खापरी, बळेगांव, सायले इत्यादी गावात करून या गावांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय समतोल बिघडवण्याचे काम शासन करु पाहत आहे, अशी येथील ग्रामस्थांची भावना निर्माण झाली आहे. धरणात बाधीत होणाऱ्या गावांना धरण पाहिजे असेल तर जरूर करा पण, आमच्या गावात त्यांचे पूनर्वसन नको अशी भूमिका खापरी ग्रामस्थांची असून तसे निवेदन त्यांनी मुरबाड तहसीलदारांना दिले आहे.

काळू, शाई धरणात बाधित होणाऱ्या गावांचे पुनर्वसनाची यादी शासनाने प्रसिद्ध केली आहे. या यादीमुळे एकीकडे स्थलांतरित गावातील नागरिकांत संभ्रमाचे वातावरण आहे. तर दुसरीकडे विस्थापितांचे पुनर्वसन खापरी, सायले, बळेगाव धरणाखालील गावात करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पण खापरी गावातील नागरिकांना शेती व्यतिरिक्त कोणताच व्यवसाय नाही. जोडव्यवसाय म्हणून प्रापंचिक खर्च भागवण्यासाठी दुग्धव्यवसाय केला जातो. अशा गावातील जमीन काळू धरणात विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी संपादित केल्यास खापरी येथील शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन हिरावणार असल्याने उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे काळू धरणातील बाधित शेतकऱ्यांचे पुनर्वसन खापरी गावात नको, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली असून तशा प्रकारचे निवेदन तहसीलदार यांना दिले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा
# ठाण्यात आनंद दिघे यांचे भव्य स्मारक उभारणार



◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी त्यांचे राजकीय गुरू आणि ठाण्याचे दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे यांचा ४२ मीटर उंच भव्य पुतळा ठाण्यात उभारण्यात असल्याची घोषणा केली. ठाण्यात शिवाजी मैदानातील घड्याळ टॉवरच्या नूतनीकरणाच्या भूमिपूजन सोहळ्यादरम्यान त्यांनी हा महत्त्वाचा निर्णय जाहीर केला.

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमात त्यांनी सांगितले की, "दिघे साहेबांच्या आशीर्वादानेच मी मुख्यमंत्री होऊ शकलो. त्यांच्या स्मृतीला अजरामर करण्यासाठी कोणतीही आर्थिक अडचण येणार नाही. धर्मवीर आनंद दिघे टॉवर हा ठाण्याच्या तलावपाळीजवळील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात पुन्हा उभारण्यात येणार आहे. या टॉवरमध्ये आनंद दिघे यांचा ४२ मीटर उंच 'किंग-साईज' पुतळा असणार आहे.

शिंदे यांनी जाहीर केले की, "दिघे आणि ठाणे हे समानार्थी शब्द आहेत. त्यांनी ठाणे परिसरात शिवसेनेचा भक्कम बालेकिल्ला उभा करण्यासाठी घेतलेली मेहनत आणि शहराच्या विकासात दिलेले योगदान विसरता येणार नाही."

२०२२ साली शिवसेनेचं नेतृत्व स्वीकारल्यानंतर जवळपास तीन वर्षांनी त्यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या स्मारकासाठी ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुतळ्याबरोबरच नागरिकांसाठी विविध सुविधा, सौंदर्यीकरण आणि स्मृतीस्थळ विकास कामे करण्यात येणार आहेत.

दरम्यान, शहरातील इतर नागरी प्रकल्पांचाही शुभारंभ या सोहळ्यावेळी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. शिंदे यांनी ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकाच्या बाहेरच्या परिसराचे सौंदर्यीकरण प्रकल्पालाही सुरूवात केली. यामुळे पादचाऱ्यांची व वाहनांची वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे. हे स्मारक ठाणेकरांसाठी प्रेरणेचे स्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## तृतीयपंथी महिलेला घराबाहेर हाकलण्याचा प्रयत्न

**कळवा :** कळवा परिसरात बेलापूर रोड येथे हॉटेल आमंत्रणच्या बाजूला राहणाऱ्या एका तृतीयपंथी महिलेला घरातून जबरदस्तीने हाकलण्याचा प्रयत्न एका व्यक्तीने केला. या बेकायदेशीर कृत्यावर प्रशासनाने सुरुवातीला कोणतीही ठोस कारवाई केली नाही, त्यामुळे तृतीयपंथीयांमध्ये प्रचंड संताप उसळला. सदर तृतीयपंथ या घरामध्ये जवळजवळ ४० ते ४५ वर्ष राहत आहे. त्यांच्याकडे कळवा ग्रामपंचायतीच्या पावत्या तसेच महापालिकेचे टॅक्स पावती सुद्धा आहे. स्वतःच्या घराच्या हक्कासाठी त्या संघर्ष करीत आहेत. संबंधित महिलेच्या मदतीसाठी अनेक तृतीयपंथी महिला धावून आल्या. पोलिस स्टेशन आणि कळवा प्रभाग समितीमध्ये तक्रार दाखल करूनही सुरुवातीला केवळ आश्वासने मिळत होती. अखेर, तृतीयपंथीयांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर कळवा प्रभाग समिती अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. त्यामुळे बळकावलेले घर परत मिळाल्याबद्दल तृतीयपंथानी प्रशासनाचे आभार मानले.

## वेचक

### वारीत आसरा फाऊंडेशन, आरोग्यमतर्फे मोफत आरोग्यसेवा

**कल्याण :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी ठाण्यातील आसरा फाउंडेशन व आरोग्यम् यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच इतर सामाजिक संस्थांच्या सहकार्याने, लोणद येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सेवाभावी उपक्रमात ८ कायरोप्रॅक्टिक थेरेपिस्ट आणि २५ हून अधिक डॉक्टर यांनी आपला सहभाग नोंदवत वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली. अनेक वारकऱ्यांना आवश्यक औषधे मोफत वितरीत करण्यात आली. या शिबिरात डॉ. पंकज जिरापुरे, डॉ. आशिष शिंदे, डॉ. अमोल साळुंखे, डॉ. दत्तात्रय राजे, डॉ. प्रशांत स्वामी, प्रतीक कांबळे यांच्यासह अमेरिकेतून खास या सेवेसाठी आलेले डॉ. राहुल वडके यांचा समावेश होता. आरोग्यम् संस्थेच्या संस्थापक शर्मिला सुतार यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. या सेवाकार्यातील अनुभव सांगताना आसरा फाउंडेशनचे विश्वस्त प्रदीप पाटील म्हणाले, "आषाढी वारी ही केवळ एक धार्मिक यात्रा नसून ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आमचे सामाजिक कर्तव्य मानतो. आरोग्यदायी शरीरामुळेच ते आपली वारी सुखरूप व यशस्वीपणे पूर्ण करू शकतात. ही सेवा देताना आम्हाला खूप समाधान लाभले."

### निळजे परिसरात भगवान जगन्नाथ यात्रा उत्साहात

**कल्याण :** निळजे, लोढाहेवन तसेच पलावा शहराजवळ साई सिटी गृहप्रकल्प उभारत असलेल्या ठिकाणी भव्य श्री जगन्नाथ मंदिर उभारण्यात येणार आहे. मंदिराच्या भव्य निर्माणासाठी साई सिटीचे डायरेक्टर संतोष दीक्षित व वीरेंद्र सिंग यांनी भगवान जगन्नाथ मंदिरासाठी जागा उपलब्ध करून दिल्याने ओडिया समाजातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या ठिकाणी आता छोटे मंदिर असून त्यात भगवान जगन्नाथ यांचे वास्तव आहे. त्या ठिकाणी मागील दोन तीन वर्षापासून छोटे मोठे उत्सव होत असतात. काही दिवसांतच या ठिकाणी एक भव्य मंदिर उभारले जाणार असून महाराष्ट्र राज्यातील भव्य मंदिरामध्ये एकमेव असे हे भगवान जगन्नाथाच्या मंदिराचे स्थान असणार आहे.

### पॅराजेम्पर अजित कारभारी १३ - १५ हजार फूट आकाशात झेंडा फडकवणार

**कल्याण :** नागरी संरक्षण दलाचा स्थापना दिन १० जुलै रोजी पॅराजेम्पर अजित कारभारी १३००० - १५००० फूट आकाशात झेंडा फडकवणार असून याबाबत कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी अजित कारभारी यांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र शासन गृह विभाग विशेष, नागरिक संरक्षण दल ठाणेचे नियंत्रक अशोक शिनगारे (जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी ठाणे) आणि उपनियंत्रक विजय जाधव (नागरी संरक्षण दल ठाणे) सहाय्यक उपनियंत्रक अनिल गावित यांच्या मार्गदर्शनाखाली पॅराजेम्पर अजित कारभारी नागरी संरक्षण दलाच्या स्थापना दिवसासाठी आकाशात झेंडा फडकवणार आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी नागरी संरक्षण व आपत्ती व्यवस्थापनासाठी नागरी संरक्षण संघटनेचे स्वयंसेवक बनवून देशसेवा करावी यासाठी अजित कारभारी प्रयत्नशील आहेत.

### मुंबई विद्यापीठाच्या ठाणे विभाग क्रीडा समितीची वार्षिक सभा यशस्वी

**कल्याण :** मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत विभाग क्रमांक तीन ठाणे विभाग क्रीडा समितीची २०२४-२५ या वर्षासाठी समारोपिय वार्षिक सर्वसाधारण सभा एसएसटी महाविद्यालय येथे पार पडली. सभेचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. या सभेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांची अध्यक्षपदी आणि प्रा. राहुल अकुल यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. विशेष उपस्थितीत मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी आणि विद्यापीठ मंडळाचे सदस्य डॉ. चंद्रकांत म्हात्रे यांचा समावेश होता. ठाणे विभागातील विविध ४० महाविद्यालयांचे क्रीडा संचालक सभेस उपस्थित होते. सभेमध्ये डॉ. मनोज रेड्डी यांनी ठाणे विभागाच्या २०२४-२५ या वर्षातील कार्याचा गौरव करत एसएसटी महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले. शै.वर्ष २०२४-२५ मध्ये प्रा. गणेश मोरे, प्रा. उमेश सोनवणे, प्रा.रोहिणी डोंबे डॉ. यज्ञेश्वर बागराव, डॉ.विजय सिंह तसेच प्रा.सतीश राजगुरू या ठाणे विभागीय समिती सदस्यांनी विशेष मेहनत घेतली होती. त्यामुळेच २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी यजमानपद पुन्हा एकदा एसएसटी महाविद्यालय यांना देण्यात आले.

## विठुरायाच्या भक्तिगीताचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते उद्घाटन

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

स्वर सारंग प्रस्तुत 'दिन आले हो... आले हो पंढरीच्या वारीचे' या विठुरायाच्या भक्ती गीताचे उद्घाटन मुरबाड विधानसभा आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते झाले. या भक्ती गीताची रचना महेशकुमार धानके (शिवसुत) यांनी केली असून महामार्ग पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार संजय घुडे यांनी आपल्या आवाजात हे भक्ती गीत गायले आहे. आपली नोकरी सांभाळून भजन कीर्तनाच्या माध्यमातून ते समाजसेवा करत असतात.

आयुष्यात आपण स्वतःसाठी जगतो परंतु दुसऱ्यांसाठी जगणे म्हणजेच आयुष्य. इतरांना मदत करून मिळणारे समाधान हे



मनाला नेहमी प्रसन्न ठेवत असते आणि हेच त्यांच्या जीवनाचे सार आहे.

या भक्ती गीताचे ध्वनिमुद्रण व संगीत संयोजन रुपेश गोंधळी, (आरजी) म्युझिक लॅब, मुरबाड यांनी केले असून कोरस काशिनाथ पागर व परेश लाटे यांनी केले आहे तर छायाचित्रण, एडिट जय कैलास मनोरे यांनी केले आहे.

## आधी गडकरी मगच घाणेकर नाट्यगृह...

**ठाणे :** राम गणेश गडकरी रंगायतन सुरू झाल्यानंतरच डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले जाणार असल्याचे ठाणे महापालिकेने नुकतेच स्पष्ट केले. शहरातील दोन्ही नाट्यगृहे एकाचवेळी बंद झाल्यास ठाणेकर रसिक आणि नाट्यकलावंतांच्या नाराजीला सामोरे जावे लागू नये म्हणून महापालिकेने हा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. गेल्या १० ते ११ महिन्यांपासून ठाण्यातील गडकरी रंगायतनचे काम सुरू आहे. मात्र, अद्याप हे नाट्यगृह बंदच आहे. अशातच डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या छताला गळती लागल्याने त्याच्या दुरुस्तीचे कामही पालिकेने हाती घेण्याचे ठरविले होते. त्यासाठी येत्या ७ जुलैपासून हे नाट्यगृह बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु ठाणे महापालिकेने एक पाऊल मागे घेतले आहे.

## आणीबाणी विरोधातील मॉक पार्लमेंट

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

भारतीय जनता युवा मोर्चा ठाणे-कोकण विभाग यांच्या वतीने काँग्रेस काळातील लागू करण्यात आलेल्या आणीबाणीविरोधात एक संसदीय चर्चात्मक बैठकीचे (मॉक पार्लमेंट) आयोजन करण्यात आले होते. युवा मोर्चा महाराष्ट्र प्रभारी आमदार विक्रांत पाटील , युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, युवा मोर्चा महामंत्री निखिल चव्हाण यांच्या निर्देशानुसार झाली. ठाणे-कोकण विभाग मॉक पार्लमेंट संयोजक कॅप्टन पराग पातकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपा ठाणे येथील वर्तक नगर विभागीय कार्यालयात मॉक पार्लमेंट पार पडले.

या मॉक पार्लमेंटमध्ये आणीबाणीच्या काळातील घटनांवर चर्चा व निवेदने सादर करत युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी आणीबाणी विरोधातील खदखद बोलून दाखवली. तसेच आणीबाणी लागू केलेला "२५ जुन काळा दिवस " पाळण्यात आला. या संदर्भात सभागृहात चर्चा झाली व ठरावही बहुमताने मंजूर करण्यात आला. आणीबाणी भोगलेल्या व्यक्तिंचा यावेळेस सत्कारही भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आला. यावेळी आमदार संजय केळकर, प्रदेश सरचिटणीस माधवी ताई , आमदार निरंजन डावखरे, ठाणे जिल्हा अध्यक्ष संदीप लेले जी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या मॉक पार्लमेंट मध्ये पहिले उत्कृष्ट संसदरत्न म्हणून तेजस लाड, द्वितीय उत्कृष्ठ संसदरत्न रणवीर वाजपेयी , तृतीय उत्कृष्ठ संसदरत्न रोहित कलवार यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या मॉक पार्लमेंट चे आयोजन ठाणे जिल्हाध्यक्ष सूरज दळवी, प्रदेश सचिव रवी तिवारी, प्रदेश सचिव ओंकार चव्हाण,यांनी केले. युवा मोर्चा सर्व प्रदेश पदाधिकारी व जिल्हा महामंत्री सर्व पदाधिकारी उपस्थित होते

## प्रलंबित भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा

**मुरबाड :** मुरबाड नगर पंचायत, जि. ठाणे स्थापना सन २०१५ रोजी करण्यात आली. मुरबाड नगर पंचायतीमध्ये ग्रामपंचायत काळापासून एकूण ९५ कर्मचारी होते. तेव्हापासून या कर्मचाऱ्यांच्या खात्यात भविष्य निर्वाह निधी जमा होणे बाकी होते. मार्च २०२५ मध्ये ग्रामपंचायत पर्यंतची रक्कम व ज्या कर्मचाऱ्यांची बदली झाली अशांची रकम त्यांच्या खात्यात टाकण्यात आली होती. मात्र नगर पंचायत स्थापनेपासून च्या रकमा भरणा करणे प्रलंबित होते. तरी या सर्व कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम रु. ७९,९७,७३२/- त्यांच्या खात्यात भरणा करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी मा. नगराध्यक्ष संतोष चौधरी आणि मुख्याधिकारी मनोज म्हसे यांचे आभार व्यक्त केले. तसेच यापुढे रक्कम वेळोवेळी त्यांच्या खात्यात जमा होईल असे आश्वासन मुख्याधिकारी यांनी दिले.

## १३ व्या मजल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

**बदलापूर :** बांधकाम साइटवर काम करताना १३ व्या मजल्यावरून पडून एका कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि. २८) दुपारी तीनच्या सुमारास बदलापूर पूर्वेला सुरवळ चौकात घडली. प्रमोद खाडीया (वय ३३) असे मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. तो मूळचा छत्तीसगड येथील होता. मागील काही महिन्यांपासून तो पत्नीसह या इमारतीच्या बांधकाम साईटवर काम करत होता.

शहरातील अनेक बांधकाम साईडवर काम करीत असलेल्या कामगारांना ठेकेदार सुरक्षा पुरवित नसल्याने अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे तर अनेकांना गंभीर दुखापत होत आहे. बांधकाम साईडवरील कामगारांना सुविधा मिळत आहेत की नाही, याबाबत स्थानिक प्रशासन तसेच राज्यशासनाचे अधिकारी ही दुर्लक्ष करीत असल्याचे नागरिकांकडून ऐकायला मिळते.

## वृक्ष छाटणीमुळे जगन्नाथ रथयात्रेला अडथळा

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

दरवर्षी आषाढ द्वितीयेला प्रचंड भक्तीभावाने मीरा रोडच्या सृष्टी भागातील इस्कॉन मंदिरातून निघून परिसरात परिक्रमण करणाऱ्या जगन्नाथ रथ यात्रेला यावर्षी मंदिराजवळील अंतिम टप्प्यात असताना संध्याकाळी ६ वाजता महापालिकेने रथ यात्रेच्या मार्गावरील वृक्ष फांद्यांची छाटणी सुरू केल्याने अडथळा निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी कुशलतेने रहदारी हाताळल्याने रथ यात्रेचे मार्गक्रमण सुरळीत झाले.

दरवर्षी आषाढ द्वितीयेला इस्कॉन मंदिरातून जगन्नाथ रथ यात्रा निघत असते. यावर्षी रथ यात्रेचे २२ वे वर्ष होते. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार २००३ मध्ये २०० भाविकांच्या सहभागाने सुरू झालेल्या रथ यात्रेला यावर्षी सुमारे ५० हजार भाविकांनी सहभाग घेतला होता. ओडिशा राज्यातील जगन्नाथपुरी




येथील रथ यात्रेला जे भाविक जाऊ शकत नाहीत ते मीरा रोडच्या रथ यात्रेत सहभागी होतात. त्यामुळे येथील रथ यात्रेला महत्त्व प्राप्त होऊन भाविकांची संख्या वाढत गेली. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा इस्कॉन मंदिरातून निघून मीरा रोडच्या अनेक भागातून जात सृष्टी परिसरातील जवळील अंतिम टप्प्यात आली असताना नेमके त्याचवेळी येथे महापालिकेने वृक्ष फांद्यांची छाटणी सुरू केली होती. छाटणी करण्याचे यंत्र असलेल्या गाड्या घेऊन कर्मचारी फांद्या छाटण्याचे काम करत होते, तुटलेल्या फांद्या रस्त्यावर पडत होत्या तसेच कर्मचारी वाहने घेऊन ते गोळ्या करण्याचे काम करत होते. त्यामुळे वाहतूक खोळंबा आणि यात्रेला अडखळा निर्माण झाला. पोलिसांनी कुशलतेने रहदारी हाताळल्याने रथ यात्रेचे मार्गक्रमण सुरळीत झाले. महापालिकेला माहिती असूनही रथ यात्रेच्या अंतिम टप्प्यात तेही संध्याकाळी सहा वाजता हे काम घेणे गरजेचे होते का अशी चर्चा भाविकांत सुरू होती.

# 'पाठ्यपुस्तकात बोली भाषांची सक्ती करावी'

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

सरकारला भाषांची सक्तीच करायची असेल, तर पाठ्यपुस्तकात बोलीभाषांची करावी, अशी मागणी ठाणे, रायगड जिल्ह्यातील आगरी आणि भूमिपुत्र साहित्यिकांनी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना पहिलीपासून तीन भाषांचा अभ्यास करावा लागणार आहे. या तीन भाषांमध्ये हिंदीचा समावेश करण्यात आला आहे. मात्र या निर्णयाला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोध दर्शविला आहे. येत्या ५ जुलैला मुंबईत ठाकरेंनी मराठी माणसाच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनाला राजकीय क्षेत्रासह साहित्य क्षेत्रातून




देखील वाढता पाठिंबा मिळत आहे. आगरी साहित्यिकांनी देखील या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला असून ५ जुलैच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन समाजबांधवांना करण्यात आलं आहे. दरम्यान आगरी, कोळी, मालवणी, कोकणी आणि अहिराणी अश्या बोली भाषा आहेत. सरकारला भाषांची सक्तीचं करायची असेल तर पाठयपुस्तकात बोली भाषांची करावी अशी मागणी आगरी साहित्यिक सर्वेश तरे यांनी केली आहे.

## अंबर इंटरनॅशनल स्कूल, व्योमिका स्पेस ॲकॅडमी यांच्यात सामंजस्य करार संपन्न
# ठाण्यात पहिल्या 'स्पेस एज्युकेशन लॅब'ची निर्मिती होणार

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाण्यातील 'अंबर इंटरनॅशनल स्कूल' आणि 'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात इस्त्रोच्या स्पेस ट्यूटर प्रोग्राम अंतर्गत व्योमिका स्पेस अकॅडमी यांच्यात शनिवारी, २८ जून रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये मुंबई महानगर क्षेत्रातील (एम. एम. आर.) पहिली स्पेस एज्युकेशन लॅब ठाण्यातील अंबर इंटरनॅशनल स्कूल येथे लक्ष्मण कदम यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात येणार आहे. ठाण्यातील तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना



अंतराळ संशोधन क्षेत्राची कवाडे खुली करून देण्याच्या हेतूने शारदा एज्युकेशन सोसायटीच्या अंबर इंटरनॅशनल स्कूल येथे स्पेस एज्युकेशन लॅब निर्मित करण्यात येणार आहे. याप्रसंगी अंबर स्कूलचे संचालक लक्ष्मण कदम यांनी देखील आपली भूमिका मांडली. ही स्पेस लॅब विद्यार्थ्यांसाठी सहभागशील करण्याच्या दृष्टीने भर देणार असल्याने त्यांनी यावेळी सांगितले. आमचा उद्देश भावी अंतराळवीर, ॲस्ट्रोफिजीसिस्ट, स्पेस सायंटिस्ट आणि एअरोस्पेस इंजिनिअर्स घडवण्याचा आहे, असे संचालक लक्ष्मण कदम यांनी यावेळी नमूद केले. व्योमिका स्पेस अकॅडमीचे गोविंद यादव यांनी या लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन क्षेत्राची मूलभूत ओळख होईल आणि विद्यार्थी या क्षेत्राकडे आकर्षित होतील असा विश्वास व्यक्त केला. अंतराळ संशोधक क्षेत्राचे अभ्यासक प्रा. डॉ. प्रतीक मुणगेकर यावेळी म्हणाले की, "विद्यार्थ्यांना शालेय वयातच अंतराळ संशोधन क्षेत्राची ओळख करून देणाऱ्या विशेष पायाभूत सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यास याक्षेत्रात मराठी टक्का वाढेल. शाळांमध्ये स्पेससायन्स आणि इनोव्हेशन लॅब्स स्थापल्यास ग्रामीण व शहरी अशा दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या जगाशी जोडता येईल."

शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा.डॉ. प्रदीप ढवळ यांनी या स्पेस लॅबच्या माध्यमातून शिक्षण रंजक आणि प्रेरणादायी करण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नियमावलीमध्ये सुधारणा आवश्यक

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

रस्त्यावरील वाहतुकीला शिस्त लावून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी एकात्मिक पार्किंग व्यवस्था आणणे गरजेचे असून त्या अनुषंगाने एमएमआर क्षेत्रात नगर विकास विभागाने नियमावलीमध्ये पार्किंग व्यवस्थेवर आधारित आवश्यक ते बदल करणे गरजेचे असल्याचे मत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एमएमआर क्षेत्रातील महापालिका आयुक्तांच्या बैठकीत बोलताना व्यक्त केले आहे. बैठकीला परिवहन विभागाचे अतिरिक्त सचिव संजय सेठी, नगरविकास विभागाचे अतिरिक्त सचिव असिम गुप्ता तसेच परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह सर्व महापालिकेचे आयुक्त



उपस्थित होते.

भविष्यात शहराच्या विकास आराखड्यामध्ये पालिकेने पार्किंगसाठी विशेष जागा उपलब्ध करून देणे बंधनकारक ठरणार आहे. त्या अनुषंगाने नगरविकास विभागाने आपल्या नियमावलीमध्ये बदल करून नवीन १४ सूचनांचा समावेश असलेला आराखडा एमएमआर क्षेत्रातील महापालिकांना पाठवावा अशी सूचना प्रताप सरनाईक यांनी केली. नगरविकास खात्याचे अतिरिक्त सचिव असीम गुप्ता यांनी भविष्यात रस्त्याच्या कडेला असलेल्या अवैध पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिकेने आपल्या मोकळ्या जागेवर पे अँड पार्क वर आधारित पार्किंग व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असून याबरोबरच जे रस्ते रुंद आहेत, त्या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही अशा प्रकारे महापालिकेने एक दिवस आड पार्किंग व्यवस्था निर्माण केली पाहिजे असे मत व्यक्त केले.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते बाजीराव पेशवे पुतळ्याचे अनावरण



( छाया : मंदार टन्नू )

**पुणे :** अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांचा खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे अनावरण शुक्रवारी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम सकाळी १०.४५ वाजता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी(एनडीए) येथे होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे, थोरले बाजीराव पेशवे यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा, एनडीएचे कमांडंट ॲडमिरल गुरचरण सिंह यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. थोरले बाजीराव पेशवे यांचा भव्य अश्वारूढ पुतळा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे उभारण्यासाठी माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांच्या मदतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार्य केल्याने पुतळा उभा करण्याची परवानगी मिळाली. सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे यांचेही पुतळा उभारण्यात सहकार्य लाभले आहे.

# पूर्णानगरमधील नागरिकांना महावितरणचा 'जोर का झटका'

### वाढीव वीज बील आल्याने नागरिक त्रस्त

**◆ पिंपरी (प्रतिनिधी ):**

चिंचवड, पूर्णानगरमधील नागरिक सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मनमानी कारभाराने त्रस्त झाले आहेत. येथील काही नागरिकांना आलेल्या बिलामध्येच मोठ्या प्रमाणात वाढीव दर आकारण्यात आले आहे. वीज पुरवठ्याकरिता नवीन स्मार्ट मीटर बसवल्या नंतर हा प्रकार घडला आहे. त्यामुळे नवीन स्मार्ट मीटरबाबतही नागरिक प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत.

जे मीटर बदलले त्याला हजार रुपये बिल येत होते तिथे दीड हजार, दोन हजार त्याही पेक्षा जास्तीची बिल आली आहेत. सध्या मुलांच्या शाळा सुरू आहेत त्यामुळे शालेय खर्च, अचानक वाढलेले लाईट बिल या दुहेरी सकटामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वेळेवर बिल भरले नाही तर,



लाईट कापण्याची धमकी दिली जात आहे . त्यामुळे नागरिक हतबल झाले आहेत.

पूर्णानगर येथील नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन संबंधित अधिकारी मुंडे यांना वाढीव लाईट बिल जमा करून देण्यात आली. त्यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. कॉम्प्युटरवर बिल चेक करून दाखवले. त्यांचे म्हणण आहे की, जुने मीटर हे सदोष होते. त्यामुळे हळू चालत होते, परिणामी बिल कमी येत होते.

याबाबत नागरिकांचे म्हणणे आहे की, "मीटर आम्ही बाजारातून खरेदी करून आणलेले नाहीत. मीटर हे आपल्याकडूनच बसवलेले आहेत. मग ते फॉल्टी कसे? यामध्ये आमची काय चुकी आहे? जे नवीन बसवले आहेत ते तरी चांगले असतील कशावरून, अचानक वाढीव रक्कम नागरिक भरणार कसे?, " याबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यानी जनसंवाद घ्यावा व नागरिकांच्या शंकेचे निरसन करावे, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा मोर्चा काढू असा पवित्रा नागरिकांनी घेतला आहे. यावेळी नक्षत्र फेज २, सोसायटीचे सेक्रेटरी अजय संभाजी पाताडे, उपाध्यक्ष पंकज निकम, राजेश नागरे, सतीश श्यालेन, तसेच इतर सोसायटीतील सभासद व नागरिक उपस्थित होते.

### स्वारगेट बलात्कार प्रकरण :
## दत्तात्रय गाडेचा जामीन अर्ज फेटाळला



**◆ पुणे (प्रतिनिधी):**

स्वारगेट एसटी स्थानकात तरुणीवर बलात्कार करणाऱ्या दत्तात्रेय गाडेचा जामीन अर्ज पुणे सत्र न्यायालयाने सोमवारी फेटाळला. सहमतीने संबंध आणि आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोपीचा बचाव अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. गांधी यांनी नाकारला. त्यामुळे गाडेचा मुक्काम येरवडा कारागृहातच असणार आहे.

स्वारगेट आगारातील शिवशाही बसमध्ये २५ फेब्रुवारी रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास आरोपी दत्तात्रेय गाडेने तरुणीवर दोन वेळा बलात्कार केल्याची घटना घडली. या प्रकरणी आरोपीविरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, ८९३ पानांचे आरोपपत्र पुणे न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तत्पूर्वी आरोपी गाडेने ॲड. वाजेद खान बिडकर यांच्यामार्फत जामीनासाठी अर्ज केला होता. आरोपीच्या बचावासाठी ॲड. बिडकर यांनी हा बलात्कार नसून सहमतीने संबंध असल्याचा दावा केला होता. आरोपीवरचे पूर्वीचे गुन्हे हे लैंगिक अत्याचाराचे नसून चोरी व दरोड्याचे आहेत, असा युक्तिवादही बचाव पक्षातर्फे करण्यात आला.

आरोपीच्या अर्जाला विशेष सरकारी वकील अजय मिसार आणि पीडितेच्या वकील ॲड. श्रीया आवले यांनी विरोध केला. आरोपीने पीडितेच्या इच्छेविरुद्ध व तिच्या संमतीशिवाय लैंगिक अत्याचार केला आहे. या प्रकरणाच्या तपासात काही अत्यंत महत्त्वाचे व निर्णायक पुरावे समोर आले आहेत.

त्यामध्ये आरोपी व पीडिता यांच्यात पूर्वी कोणताही संपर्क नव्हता व त्यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही, असे निदर्शनास आले आहे. आरोपीस जामिनावर सोडल्यास पीडितेच्या जिवाला धोका निर्माण होईल, असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील आणि पीडितेच्या वकिलांनी केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपी गाडेचा जामीन अर्ज फेटाळला.

## दिवसाढ्वळ्या कोयता हल्ला; सराफाचे दुकान लूटले

**पुणे :** सिंहगड रस्ता परिसरातील वडगाव बुद्रुक येथील 'गजानन ज्वेलर्स' या सराफाच्या दुकानावर चार दरोडेखोरांनी दिवसाढ्वळ्या कोयता हल्ला करत लाखोंच्या ऐवजावर हात साफ केले. दिवसाउजेडी घडलेल्या या घटनेने शहरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्हे उभे ठाकले आहे. या हल्ल्यात दुकानमालक आणि एक कर्मचारी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरोडेखोरांनी दुकानात शिरून, कोयत्याने वार करत दुकानातील लोकांना घायाळ केले. घटनेची माहिती मिळताच सिंहगड रस्ता पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, या दरोडेखोरांचा फोटो समोर आला आहे. मोटरसायकलीवरील तीन इसम हे गजानन ज्वेलर्स या दुकानातून दरोडा टाकून वडगावच्या दिशेने रवाना झालेले आहेत. काळ्या रंगाच्या गाडीवर पुढे बसलेल्याने निळ्या रंगाचे जॅकेट व ग्रे कलरची पॅन्ट व मागे बसलेल्याने गुलाबी रंगाची हुडी व ब्लॅक रंगाची पॅन्ट परिधान केली आहे.

## वेचक

### कौटुंबिक न्यायालयात ई-फायलिंग सेंटर

**पुणे :** कौटुंबिक न्यायालयात 'दि पुणे लॉयर्स कंझ्युमर सोसायटी'चे 'ई-फायलिंग सेंटर' सुरू झाले आहे. या सेंटरचे उदघाटन कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश शाम रूक्मे , पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड आणि फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गणेश कवडे यांचे हस्ते झाले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ई -फायलिंग बंधनकारक झाले आहे. कंझ्युमर सोसायटी शिवाजीनगर न्यायालयात २०२३ पासून ही सेवा देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कौटुंबिक न्यायालयात हे सेंटर सुरू करण्याची मागणी होत होती. या सेंटरमधून वकील आणि पक्षकारांना अल्पदरात सेवा देण्यात येणार आहे. सर्वांनी या सेंटरचा लाभ घ्यावा, असे आवाहन कझ्युमर सोसायटीच्या चेअरमन ॲड. रेखा करंडे यांनी व सर्व संचालक मंडळाने केले आहे. यावेळी पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र दौंडकर यांच्यासह वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू; तिघे जण गंभीर जखमी

**पुणे :** शहरातील कॅम्प परिसरात एका इमारतीचे काम सुरू असताना स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत तीन जण गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॅम्प परिसरातील साचा पीर स्ट्रीट मार्गावरील इमारतील स्लॅब दुपारच्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत चार जण खाली पडले. शुभंकर मंडल या कामगाराचा जागीच मृत्यू झाला आहे, तर अन्य तीन कामगार गंभीर जखमी झाले आहे. सर्वांना जवळील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. कामगारांनी कोणत्याही प्रकारची सुरक्षा साधने वापरली नव्हती, अशी माहिती समोर येत आहे. या घटनेची माहिती समजताच पोलीस आणि अग्निशामक दलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. या प्रकरणी तत्काळ चौकशी करून जबाबदारांवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

### डॉक्टर महिलेला पाच लाखांना फसवले

**पुणे :** सायबर चोरट्यांनी एरंडवणे भागातील एका डॉक्टर महिलेला पाच लाख रुपयांना लुबाडले आहे. चोरट्यांनी महिलेचा मोबाईल हॅक करुन तिच्या बँक खात्यातून रोख रक्क्म चोरली आहे. याबाबत या डॉक्टरने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७३ वर्षीय डॉक्टर कर्वेनगर भागातील सहवास सोसायटीत रहातात. चोरट्यांनी त्यांच्या मोबाइलवर संपर्क साधून गॅस कंपनीच्या ग्राहक तक्रार निवारण केंद्रातून बोलत असल्याचे सांगत गॅस बिल थकीत असून, गॅस पुरवठा खंडीत करण्यात येईल, असे सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना एमएनजीएल एपीके फाईल पाठविली. ही फाईल त्यांना उघडण्यास सांगितले. मोबाइल हॅक केला आणि मोबाइलमधील बँक खात्याची गोपनीय माहितीचा गैरवापर करुन त्यांच्या बँक खात्यातून चार लाख ९५ हजार रुपये लांबविले. खात्यातून रकम दुसऱ्याच खात्यात वळविण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे तक्रार केली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल माने तपास करत आहेत.

### वेदमूर्ती नटराजशास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंदांचा सहभाग
## 'दगडूशेठ' गणपती मंदिरात २१ दिवसीय अतिरुद्र महायज्ञ

**◆ पुणे (प्रतिनिधी) :**

सुप्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे २१ दिवसांचा अतिरुद्र महायाग मंदिरात होणार आहे. यामध्ये तब्बल ६५ ब्रह्मवृंद सहभागी होणार असून ५ ते २५ जुलै दरम्यान दुपारी १ ते सायंकाळी ७ यावेळेत हा महायाग होणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

पुढील २० दिवसांत दररोज गणपती बाप्पांना ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक, गणेश याग, रुद्र होम, अरुणाप्रश्न होम, दुर्गा होम, महालक्ष्मी होम, पार्वती स्वयंवर होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, विष्णू सहस्त्रनाम अर्चना, मेधा दक्षिणा मूर्ती होम याशिवाय सभामंडपात पुरुषसुक्त होम यांसह विविध धार्मिक विधी होणार आहेत. २५ जुलैपर्यंत दररोज ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत धार्मिक विधी मंदिरात सुरू राहणार आहेत. शुक्रवारी ३३ कोटी देवता याग व हर्विद्रव्य वनौषधीसहित पूर्णाहुती होणार आहे. अतिरुद्र होम हा या धार्मिक विधींतील



सर्वोच्च बिंदू आहे.

दगडूशेठ गणपती मंदिरात मागील चार वर्षांपासून हा यज्ञ करण्यात येत आहे. अतिरुद्र महायागाचे हे ५ वे वर्ष आहे. मंदिराच्या सभामंडपात भव्य होमकुंड साकारुन हे अतिरुद्र होम करण्यात येणार आहे. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंद यामध्ये सहभागी होतील. शनिवार, दि. ५ जुलै रोजी महासंकल्प, नांदी श्राद्ध, वैष्णव श्राद्ध, पुण्याह वाचन, महान्यास, गणेश अर्चना, रुद्र जप, गणेश याग, रुद्र होम, नवग्रह होमाने अतिरुद्र महायज्ञास प्रारंभ होईल. २१कुंडांचे जल या काळात वापरले जात आहे. तसेच २१ आयुर्वेदिक औषधी वापर होम-हवनाच्या वेळी करण्यात येत आहे. श्रींना जलाभिषेक करण्यात येत आहे.

## डॉ . शंकर अभ्यंकर यांना प्रा . शिवाजीराव भोसले स्मृती सन्मान जाहीर

### साखळीपीर तालीम वसंत व्याख्यानमालेचा विशेष सन्मान

**◆ पुणे (प्रतिनिधी):**

प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीच्या वतीने देण्यात येणारा प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती सन्मान या वर्षी प्रसिद्ध व्याख्याते डॉ. शंकर अभ्यंकर यांना जाहीर झाला आहे. गेली ३२ वर्षे श्रवणसंस्कृती समृद्ध करण्यासाठी कार्यरत असलेल्या, साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारुती मंदिर आयोजित वसंत व्याख्यानमालेचा यावर्षी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या ९८ व्या जयंती दिनी १५ जुलै रोजी (मंगळवार) सायं. ६.०० वा. एस. एम. जोशी सभागृहात होणाऱ्या समारंभात मूर्तिशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्काराचे हे बारावे वर्ष असून यापूर्वी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, डॉ. रघुनाथ माशेलकर, सिंधुताई सपकाळ, प्रा. द. मा. मिरासदार, डॉ. ह. वि. सरदेसाई, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, नरेंद्र चपळगावकर, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. यशवंत पाटणे, डॉ. अरुणा ढेरे यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. अशी माहिती प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

प्रा. जोशी म्हणाले, "महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत आणि ख्यातनाम वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीची स्थापना करण्यात आली. आपल्या अमोघ आणि विचारसंपन्न वक्तृत्वाच्या माध्यमातून समाजमानस समृद्ध करण्याचे काम प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी केले.

जीवनाच्या सर्व क्षेत्रांत व्रतस्थ वृत्तीने काम करणाऱ्या माणसांविषयी प्राचार्यांना विलक्षण आदर होता. डॉ. शंकर अभ्यंकर यांनी गेली पाच दशके व्याख्यानातून विचारजागर केला. या योगदानाबद्दल हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचे समितीने ठरविले आहे.

## 'रस्त्याचे डांबरीकरण करा' मागणीसाठी जलसमाधी आंदोलन

**◆ पुणे (प्रतिनिधी):**

महाळुंगे पडवळ ते ठाकरवाडी रस्त्याचे डांबरीकरण अथवा मजबुतीकरण व्हावे या मागणीसाठी मंगळवारी शाळकरी मुले, महिला, पुरुष आदींनी ठाकरवाडी येथील बंधाऱ्यातील पाण्यात सामूहिक जलसमाधी आंदोलन केले. यावेळी प्रशासकीय अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.

सकाळी ११ वाजता सामुहिक जलसमाधी आंदोलन देसावळा, ठाकरवाडी व बारवेमळ्यातील महिला, शाळकरी विद्यार्थी व हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी सुरू केले आहे. महाळुंगे पडवळ, ठाकरवाडी मार्गे नारायणगाव हा जिल्हा मार्ग आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे काम सन २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले. मात्र सैदवाडी ते बारवेमळा फाटा दरम्यान एक किलोमीटर अंतरातील काम स्थानिक शेतकऱ्यांनी हरकत घेतल्याने रखडले आहे. पावसाळा सुरु झाल्याने रस्त्यावर अनेक ठिकाणी पाण्याची मोठी डबकी साचली आहेत. माजीमंत्री दिलीप वळसे पाटील व खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी मोबाईलहुन आंदोलन करणाऱ्या नागरिकांशी चर्चा करून प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे घोडेगावचे शाखा अभियंता सम्राट भिसे, नायब तहसीलदार सचिन वाघ, ग्रामविकास अधिकारी वनवास वासनिक यांनी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली.

### 'आप'तर्फे ३ जुलैला गुणवंतांचा गौरव

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर आम आदमी पार्टीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ३ जुलै २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी शालोपयोगी वस्तू वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अजित फाटके पाटील प्रदेश कार्यकारी अध्यक्ष, आम आदमी पार्टी (महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे. कार्यक्रमास डॉ. अभिजीत मोरे, सचिव आप उपस्थित राहणार आहेत.

## शाळेत बॉम्ब ठेवल्याची धमकी

**◆ पुणे (प्रतिनिधी):**

सिटी इंटरनॅशनल स्कूल, औंध या शाळेच्या ई-मेलवर 'शाळेच्या परिसरात शक्तिशाली स्फोटके ठेवली असून इमारत तातडीने रिकामी न केल्यास आत असलेल्या लोकांचे मृत्यू होणार, लोकांना बाहेर काढा नाहीतर, हात-पाय उडतील. आम्ही 'रोडकिल' आणि 'क्यो' या दहशतवादी संघटनेचे सदस्य आहोत. हा मेसेज मीडिया हाऊसना द्या', असा ई-मेल सोमवारी ११.५० वाजता आल्याची माहिती समोर येत आहे.

शाळेच्या प्राचार्या अपूर्वा पाटील यांनी तत्काळ चतुःश्रृंगी पोलीस ठाण्याच्या लँडलाईनवर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक, तसेच अँटी टेररिस्ट सेल व गुप्त विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यासोबतच बॉम्ब शोध व निकामी करणारे पथक (BDDS) देखील पाचारण करण्यात आले. बीडीडीएस अधिकारी डिओ सातपुते यांच्या नेतृत्वाखाली पथकाने शाळेच्या संपूर्ण इमारतीची कसून तपासणी केली. तपासणीअंती शाळा परिसरात कोणतीही स्फोटके किंवा संशयास्पद वस्तू आढळली नसल्याचे स्पष्ट झाले. चतुःश्रृंगी पोलिसांनी हद्दीतील डीएव्ही पब्लिक स्कूल, औंध आणि लॉयला स्कूल, पाषाण रोड या शाळांना भेट देऊन प्राचार्यांना अतिरिक्त सतर्कतेच्या सूचना दिल्या. हा धमकीचा मेल 'roadkillkyo' नावाच्या ई-मेल आयडीवरून पाठवण्यात आला असून, तो कोणी पाठवला, यामागे नेमके कोणते नेटवर्क कार्यरत आहे, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सायबर विभागाच्या मदतीने तपास सुरू केला आहे.

## पूरपातळी निश्चितिसाठी उड्डाणपुलांवर मार्किंग

**◆ पुणे (प्रतिनिधी):**

खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर, तसेच धरणाच्या पुढील भागातील फ्री कॅचमेंट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे मुठा नदीच्या पाण्याची पातळी नेमकी किती वाढते, हे निश्चित करण्यासाठी खडकवासला धरणापासून संगमवाडीपर्यंतच्या मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर मार्किंग करण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिले आहेत.

पावसाळा सुरू झाल्यामुळे शहरातील पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी सर्व संबंधित विभागांची बैठक घेतली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. यंदाही मुठा नदीत अवघे दोन हजार क्युसेक पाणी सोडूनही शहर व धरणाच्या पुढील भागात झालेल्या पावसामुळे भिडे पुलाला पाणी लागले होते. पूरस्थितीचा नेमका अंदाज येऊन उपाययोजनांसाठी हे मार्किंग करण्यात येणार असल्याचे दिवटे यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या हद्दीतील वारजे हायवे, म्हात्रे पूल, एस. एम. जोशी पूल, लकडी पूल, झेड ब्रीज, महर्षी शिंदे पूल, टिळक पूल, नवापूल आणि संगमवाडी पूल अशा प्रमुख पूलांवर हे मार्किंग केले जाणार आहे. या बैठकीत रस्ते दुरुस्ती, तातडीच्या खोदाईच्या परवानगी आदी कामांचा आढावाही घेण्यात आला.

**एकतानगरीत पीए सिस्टीम**

मागील वर्षी खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने एकतानगरी परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती. त्या वेळी पुराची माहिती नागरिक, तसेच प्रशासनापर्यंत वेळेवर पोहोचली नव्हती. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले होते, वाहनांचेही नुकसान झाले होते. यंदा अशा स्थितीचा पूर्वअंदाज घेता यावा, यासाठी या परिसरात नदीकाठावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. नागरिकांना सूचना देण्यासाठी नागरी सूचना यंत्रणा उभारण्यात येणार असून, त्यासाठी ध्वनिक्षेपक बसवले जातील. त्याद्वारे पाणी सोडल्याची, तसेच इतर पूरविषयक सूचना नागरिकांना दिल्या जातील. एकतानगरीसह पाटील इस्टेट येथेही ही यंत्रणा बसवली जाणार आहे.

### दौंड लैंगिक अत्याचार प्रकरण

**पुणे (प्रतिनिधी) :** दौंड परिसरात पंढरपूर दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांना कोयत्याच्या धाकाने लुबाडून, अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांची दहा वेगवेगळी पथक तैनात करण्यात आली आहेत. पुणे ग्रामीण भागातील सराईत गुन्हेगार, संशयित गुन्हेगार यांच्याकडे कसून चौकशी सुरू आहे. त्यासाठी ग्रामीण पोलिसांनी या दोन्ही आरोपींचे स्केच जारी केले आहेत, त्या आधारे तपास सुरू आहे. वारकऱ्यांचा एक टेम्पो सोमवारी मध्यरात्री पंढरपूरच्या दिशेने निघाला होता. दौंडजवळील स्वामी चिंचोली परिसरात चहापानासाठी थांबले असता दोघा दुचाकीस्वारांनी लूटमार केली. तसेच, एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर आरोपी फरार झाले.

## मावळचे माजी आमदार कृष्णराव भेगडे यांचे निधन

**◆ पुणे (प्रतिनिधी):**

मावळ विधानसभेचे माजी आ. कृष्णराव भेगडे यांचे सोमवारी रात्री निधन झाले. वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. १ जुलैला त्यांच्यावर अंत्यविधी पार पडले. 'शिक्षणमहर्षी मावळ भूषण' ही उपाधी मिळवलेले भेगडे हे १९७२ मध्ये मावळ विधानसभेतून जनसंघाच्या तिकिटावर पहिल्यांदा आमदार झाले. १९७७ ला त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. नंतर ते १९७८ ला पुन्हा विधानसभेवर निवडून आले होते. २००० साली त्यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली.



विधानसभा आणि विधान परिषद असे चार टर्म आमदार राहिलेले भेगडे राजकारणातून निवृत्त झाले. मात्र अखेरपर्यंत ते शरद पवार यांच्या सोबत एकनिष्ठ राहिले.

त्यांनी विद्यार्थ्यांसाठी शाळा, महाविद्यालये उघडली. संयमी नेतृत्वामुळे आणि कार्यक्षमतेमुळे ते सर्व पक्षीय नेत्यांमध्ये आदराचे स्थान राखून होते. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. तळेगाव नगर परिषदेचे नगरसेवक, नगराध्यक्ष भूषविलेल्या भेगडे त्यांच्या निधनामुळे मावळच्या सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी हानी झाली असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

### संत साहित्याचे अभ्यासक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ . सदानंद मोरे यांची उपस्थिती
## छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

**◆ पुणे (प्रतिनिधी) :**

"महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे काम दिवाळी अंकांनी केले आहे. मन आणि मेंदूला बौद्धिक फराळ देऊन मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी दिवाळी अंक उपयुक्त ठरतात. खऱ्या अर्थाने दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाग्य घटक आहे, " असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले. दिनमार्क पब्लिकेशनच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात आयोजित स्वर्गवासी



कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी माजी संमेलनाध्यक्ष डॉ. भारत सासणे, साहित्यिक व परीक्षक माधव राजगुरू, संयोजक दिनकर शिलेदार आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन येत्या शुक्रवारपर्यंत सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, "संत ज्ञानेश्वर महाराजांनीही दिवाळीतील अक्षर फराळाचा उल्लेख करताना ज्ञानाची दिवाळी, असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील दिवाळी अंकांना शंभरहून अधिक वर्षांची परंपरा आहे. मध्यमवर्गीय माणसाने दिवाळी अंकांना जीवित ठेवण्याचे काम केले. स्पर्धेच्या काळात काही अंक अल्पायुषी ठरले, तर काहींनी हा वारसा जपला. दिवाळी अंकांचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत गेले. आजघडीला चारशेहून अधिक अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंकांनी अनेक लेखक, साहित्यिक घडवले आहेत."

भारत सासणे म्हणाले, "दिवाळी अंकांची ही परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर गेली असून, मराठी व बंगाली भाषेत विशेष अंक निघतात. अनेक आव्हानावर मात करून ही परंपरा जाणाऱ्या संपादकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे. अंकांची संख्या वाढतेय, याचा आनंद आहे."

या प्रदर्शनात २३५ दिवाळी अंक आहेत. वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांचे सादरीकरण एकाच छताखाली व्हावे, या उद्देशाने हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण आहे. दिवाळी अंकांची यशस्वी परंपरा जपण्यासह त्यांना प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन आहे. 'अन्वय बेंद्रे' यांनी सूत्रसंचालन केले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेतून ६१ जण सेवानिवृत्त




**◆ पिंपरी ( प्रतिनिधी ):**

पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या सेवेतून ५१, तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण ६१ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची आरोग्याची काळजी घ्यावी, निरोगी आणि आनंदी जीवन जगावे तसेच आपल्या कुटुंबीयांना वेळ द्यावा, असे प्रतिपादन लोणकर यांनी केले.

सर्वांना पुढील आनंदी व आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे जून २०२५ अखेर सेवानिवृत्त होणाऱ्या कार्यक्रमावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास उप आयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे मनोज माचरे, महादेव बोत्रे, नथा माथेरे, मंगेश कलापुरे तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी तर सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# ...तरीही मी त्यांची पाठराखण केली नाही

## उमाकिरण प्रकरण : विरोधकांच्या आरोपांना आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रत्युत्तर


धनंजय मुंडेंच्या खळबळजनक आरोपावर संदीप क्षीरसागरांचा पलटवार; म्हणाले...

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड: उमाकिरण शैक्षणिक संकुलात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने राज्यभर खळबळ उडाली. या प्रकरणाती आरोपी प्रा.विजय पवार हे बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या जवळचे असून त्यांनी आरोपीना मदत केली असल्याचे आरोप अनेकांकडून करण्यात आले. परंतु आरोपी माझ्या जवळचे होते आहेत, हे मी मान्य करतो परंतु मी त्यांची अजिबात पाठराखण केलेली नाही आणि करणारही नाही. वेळ पडल्यास पीडितेला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरू. असे सांगत आ.क्षीरसागरानी विरोधकांच्या बिनबुडाच्या आरोपांना प्रत्युत्तर देत सर्व आरोप खोडून काढले आहेत. दि.२७ जून रोजी बीड शहरातील नामांकित उमाकिरण शैक्षणिक संकुलात एका अल्पवयीन मुलीवर प्राध्यापकांकडून लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. या प्रकरणातील आरोपी प्रा.विजय पवार हे आ.संदीप क्षीरसागरांच्या जवळचे आहेत. आरोपींवर आ. क्षीरसागरांचा राजकीय वरदहस्त आहे. आरोपीना आ.क्षीरसागरानी मदत केली. अशा अनेक आरोपपूर्ण बातम्यांनी सनसनी माजवली होती. मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनातही हा मुद्दा चर्चेचा ठरला. त्यानंतर आता आ.संदीप क्षीरसागर मैदानात उतरले असून त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत झालेल्या सर्व आरोपांना प्रत्युत्तर दिले.

> आरोपी हे माझ्या जवळचे आहेत हे मी अजिबात नाकारत नाही. परंतु मी त्यांच्या या प्रकरणात अजिबात पाठराखण केलेली नाही, आणि करणारही नाही. पीडित भगिनीला न्याय देण्यासाठी वेळ पडली तर रस्त्यावर उतरू. पोलीस योग्य दिशेने तपस करत आहेत. आरोपीना तातडीने अटक करण्यात आली आहे. मी सातत्याने पोलीस प्रशासनाशी चर्चा करून माहिती घेत आहे. विरोधकांनी, माझे सीडीआर तपासण्याची मागणी केली आहे. त्यालाही मी

> मस्साजोग प्रकरणात मंत्रिपद गमवावे लागल्याचे धनंजय मुंडेंना दुःख आहे. त्या आकसातून ते आरोप करत आहेत. ज्याप्रकारे ते या प्रकरणात बोलत आहेत त्याचप्रकारे, त्याच आक्रमकतेने त्यांनी स्व.संतोष देशमुख प्रकरणातही बोलायला पाहिजे होते. धनंजय मुंडे हे सत्तापक्षात आहेत. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री हे ना.अजितदादा पवार आहेत ते त्यांचे नेते आहेत त्यांच्यावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे. ना. अजितदादा असला प्रकार अजिबात खपवून घेणार नाहीत. अशी भावनाही आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

# सर्वानुमते सुनिल नाथ झाले आष्टी तालुकाध्यक्ष

## अभिनंदनिय:जिल्हास्तरीय बैठकीत केली निवड

पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी सुनील नाथ यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय कार्यकारिणीची नुकतीच बैठक संपन्न झाली. जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या झालेल्या या बैठकीत आष्टी तालुक्यातील कडा येथील रहिवाशी तथा राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात परिचित असलेले खा. शरद पवार गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते सुनील नाथ यांच्या नावाला पसंती मिळाली. त्यामुळे या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी नाथ यांची सर्वांनुमते निवड करण्यात आल्याचे घोषित करण्यात



आले. पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासास पात्र राहून पक्ष वाढीसाठी आपण निष्ठेने प्रयत्न करणार असल्याचे नाथ यांनी सांगितले. राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षपदी नाथ यांची निवड झाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के, ज्येष्ठ नेते अण्णासाहेब चौधरी व इतर मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# अनेक वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी

## पंकजा मुंडे:गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीस दिली जागा

पुण्यभूमी प्रतिनिधी
गडहिंग्लज:(जि. कोल्हापूर) उप विभागीय कार्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्यात आज झालेल्या बैठकीत पशुसंवर्धन विभागाने त्यांची ७५ आर जमीन यासाठी उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान या नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागाचे देखील स्वतंत्र कार्यालय असणार आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (व्ही.सी.द्वारे) व अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन



पान दोन...

# मुख्याध्यापकांचा सत्कार सोहळा




पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:येथील नॅशनल उर्दू हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, जुना बाजार बीड येथे तेथील माजी विद्यार्थी यांनी आज २ जुलै २०२५ रोजी मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारल्याने नवीन मुख्याध्यापकांचा सत्कार करत शाळेबद्दल आपली जबाबदारी आणि कृतज्ञता व्यक्त केली.सुरुवातीला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सिद्दीकी नदीम सर यांचा शाळेतील माजी विद्यार्थी यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व यावेळी शेख मोहम्मद सलीम यांनी मनोगत व्यक्त केले की गुरुजींच्या मार्गदर्शनामुळे आम्ही जीवनातील प्रत्येक अडचणींचे वळण सहज पार करु शकलो त्यामुळे आज आम्हाला आमच्या शाळेत येवून भेट देतांना आनंद होत आहे. मुख्याध्यापक नदीम सर म्हणाले की, आज कित्येक दिवसांनी शिक्षणप्रेमी माजी विद्यार्थी हे अतिथी रुपाने शाळेत आले त्यांची प्रगती पाहून आम्हाला आमच्या कामाची पोहोचपावती मिळाल्याचे समाधान आहे.यावेळी शेख अखील सर, शेख अब्दुल रहीमस, शेख जमीर सर, नईम देशमुख सर, सय्यद सर्फराज सर, देशमुख आसेफ सर, शेख शब्बीर सर, आदींची उपस्थिती होती.

# बॅंकेच्या मॅनेजरला शिवसेनेचा घेराव

## आक्रमक: बबनराव लोणीकरांच्या फोटोला मारले जोडे

पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई:महाराष्ट्र राज्याचे मंत्री बबनराव लोणीकरांचे मानसिक संतुलन बिघडल्याने, ते बेताल वक्तव्य करून स्वतःची बुद्धी गहाण ठेवून बोलत आहेत. त्यांच्या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो. यापुढे, बेताल वक्तव्याचा वेगळ्या पद्धतीने निषेध करण्यात येईल. असा इशारा देऊन, जगाचा पोशिंदाच खरा बाप आहे. हे फडणवीस सरकारने ध्यानात घ्यावे, असे प्रतिपादन शिवसेना तालुका प्रमुख अजय भैय्या दाभाडे यांनी येथे केले आहे. त्याच बरोबर स्टेट बँक ऑफ इंडिया मादळमोही शाखेमध्ये हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये शाखा व्यवस्थापक यांची भेट घेऊन तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्याला लागलेला होल्ड काढावा अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देताच शाखा व्यवस्थापक यांनी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्याला लागलेला होल्ड काढायला सुरुवात केली. यामुळे शेतकऱ्यांना सरकारच्या विविध योजनेचे मिळालेले पैसे काढण्यास सोयीस्कर झाले आहे. दरम्यान, शिवसेनेच्या वतीने करण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया येथील आंदोलनाची दखल खुद्द मनोज जरांगे-पाटील यांनी घेतली. त्यांनी आंदोलनाचे कौतुक करून, थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून, शेतकर्यांची अडचण दूर करण्याची सूचना केली. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने बुधवार ता. २ रोजी मादळमोही ता. गेवराई येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेला दणका दिल्याने, बॅन्केने शेतकर्यांच्या खात्याला लावलेला होल्ड काढण्यास सुरुवात केली असून, तालुका प्रमुख अजय भैय्या दाभाडे यांच्या आंदोलनला यश मिळाले आहे.




पान दोन...

# पोहनेर-खतगव्हाण रस्ता प्रश्न

## दिलासा:तहसीलदार मुंडेंनी केली पाहणी

पुण्यभूमी प्रतिनिधी
सिरसाळा:पोहनेर - खतगव्हाण हा गट नंबर ४६/४७ शेत शिवारातून जाणारा मार्ग आता पुन्हा रहदारीत येणार आहे .लवकरच सदरील रस्त्याचा प्रश्न तहसीलदार व्यंकटेश मुंडे मार्गी लावणार आहेत. गेल्या वर्षभरापासून ह्या रस्त्या संबधी पोहनेर ग्रामस्थ आक्रमक होते. महसुल,पोलीस प्रशासनाकडे सतत हा विषय मांडत होते. अखेर तहसीलदार व्यंकटेश मुंडे , मंडळ अधिकारी गणेश फड , तलाठी हनुमान शिंदे , सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई शाखा अभियंता दिपाली गित्ते यांनी जायमोक्यावर जाऊन संबंधित जागेची पाहणी करून पंचनामा केला व हा प्रश्न प्रशासकीय प्रक्रियेतून आता लवकर मार्गी लावण्या संदर्भात हालचाली सुरु केल्या आहेत. पोहनेर शिवारातून काही अंतरावरा पर्यंत हा रस्ता आहे परंतु गट नंबर ४६ व ४७ मध्ये रस्त्याला खंड पडलेला होता.हा रस्ता येथून जात नसल्याचे ह्या गटातील शेतकऱ्यांचे म्हणणे होते. परंतु कागदपत्री दस्तावेजावर ह्याच गट नंबर मधून सदरील रस्ता खतगव्हाण ( ता. माजलगाव ) कडे जातो अशी नोंद आहे . या नुसार तहसीलदार व मंडळ अधिकारी,तलाठी यांनी पाहणी करून रस्ता सदरील गट नंबर बांधावरून पुढे मार्गस्थ करण्यास सकारात्मकता दर्शवली आहे. लवकरच हा रस्ता होईल असे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी म्हटले आहे .

# परळीतील नामांतर योध्यांचा सन्मान

## भास्कर रोडे:स्मृतीशेष रामचंद्र इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार सोहळा

पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:पॅंथर आर.डी.व्हावळे यांना बीड जिल्ह्यातील मागासवर्गीय समाजाचे पहिले जिल्हा परिषद सदस्य दिवंगत रामचंद्र इंगळे (अप्पा)भारजकर यांच्या नावाने दिला जाणारा सामाजिक सेवा पुरस्कार म्हणजे परळीतील जुन्या नामांतर योध्यांचा सन्मान होय असे प्रतिपादन रिपाइं चे राज्य सचिव भास्कर रोडे यांनी केले.ते रामचंद्र इंगळे सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.शहरातील कॉम्रेड वैजनाथराव भोसले सभागृहात रविवार दिनांक २९ जून रोजी मस्मृतीशेष रामचंद्र इंगळे सामाजिक सेवा पुरस्कारफ वितरण सोहळा पार पडला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यनाथ बॅंकेचे संचालक प्रा.दासू वाघमारे,दत्ता सावंत, वंचित बहुजन आघाडीचे मिलिंद घाडगे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, प्रसिद्ध साहित्यिक अजय गंडले, दिलीप उजगरे, अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगरसेवक विजयकुमार वेडे,प्राचार्य सी.व्ही. गायकवाड,कार्यालयीन अधीक्षक सुनील फुलारी, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे रामचंद्र इंगळे सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे, सचिव बालासाहेब इंगळे,आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला आंबेडकरी चळवळीत अतुलनीय योगदान देणारे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात हिरहिरीने कार्य केलेले पॅंथर आर.डी.व्हावळे यांचा मान्यवरांच्या हस्ते ममा. रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा




पान दोन...

# न्यायिक मागण्यांसाठी पाठपुरावा

## राजेभाऊ फड:आदिवासी समाज आंदोलनास भेट

पुण्यभूमी प्रतिनिधी
मुंबई:येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त समाजाच्या न्याय हक्काच्या अनेक मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट देऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. भटक्या आणि विमुक्त समाजाच्या ज्या न्याय हक्काच्या मागण्या आहेत त्या पूर्ण होईपर्यंत आपण त्यांच्या पाठीशी आहोत, तसेच त्यासाठी जो पाठपुरावा करता येईल तो येणाऱ्या काळात आपण नक्कीच करू असे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.महाराष्ट्र विधिमंडळाचे सध्या पावसाळी अधिवेशन सुरु आहे. याच दरम्यान भटक्या विमुक्त आदिवासी समाजाच्या अनेक मागण्यांच्या संदर्भाने आंदोलन सुरू आहे. यानुषंगाने त्यांनी पाच मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने भटक्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय व मंत्री, नागरिकत्वाचे पुरावे, जमिनीचे नियमन, समाजावरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी संरक्षक कवच तसेच ३१ ऑगस्ट हा विमुक्त दीन साजरा करावा अशा मागण्या भटके विमुक्त संयोजन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आल्या आहेत. शासनाने या मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी मुंबई येथे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड यांनी भेट दिली. आंदोलकांच्या मागण्या समजून घेऊन त्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी आवश्यक असेल तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन राजेभाऊ फड यांनी दिले.



# दिंद्रुड पोलिसांचे विद्यार्थिनींना धडे

## सपोनि महादेव ढाकणे: इंदिरा गांधी कन्या शाळेत उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या शाळेतील विद्यार्थिनींना निडर होत चुकीच्या गोष्टींना बळी पडू नका,आपल्या बाबत चुकीच्या घटना घडत असतील तर प्रकाशात आणा,आपल्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव सतर्क असल्याबाबत दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांनी बुधवारी मार्गदर्शन केले. समिधा संस्थेच्या वतीने पुस्तक भेटीच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. बीड जिल्ह्यातील बीड येथील कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थिनींवर झालेल्या अघटीत घटनेने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.यासाठी दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या वतीने दामिनी पथक, पोलीस काका व पोलीस दिदी यांची कामे त्याचप्रमाणे मुलींच्या सुरक्षे विषयी विशेष धडे सपोनी महादेव ढाकणे यांनी विद्यार्थिनींना दिले. मुलींच्या बाबत काही अघटित घटना घडत असतील तर शंका मनात न ठेवता थेट पालक, आपल्या शाळेतील वर्ग शिक्षक, शिक्षिका व पोलिसांना याबाबत कळवत काही अघटीत होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत ढाकणे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. मोबाईलच्या आहारी न जाता पुस्तक वाचनावर भर द्यावा, आपल्या आई-वडिलांची मान शरमेने खाली जाणार नाही यासाठी काळजी घ्यावी याबाबत ढाकणे यांनी उपदेश दिला. बुधवारी समिधा फाउंडेशन व सरहद फाउंडेशनच्या वतीने शेकडो पुस्तकांचे वाटप इंदिरा गांधी कन्या शाळेत संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी सपोनी महादेव ढाकणे, पोलीस शिपाई अंजना मेंडके, ज्ञानेश्वर म्हेत्रे माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, बळीराम डापकर, नारायण चांदबोधले, ग्रां.पं. सदस्य महेश ठोंबरे, पत्रकार संतोष स्वामी, गणेश काटकर, मुख्याध्यापक अशोक बोचरे,रामराव लांडगे,ग्रंथालय विभाग प्रमुख डाके यांची उपस्थिती होती.



> किशोरवयीन मुलींमध्ये गुड टच व बॅड टच बाबत जागरूकता असणे आवश्यक आहे. सतर्क राहिल्यास तसेच मुलींनी योग्य वेळी लहान सहान अडचणी आपल्या पालकांना सांगितल्यास मुलींच्या बाबतीत अघटीत घटना घडणार नाहीत. चुकीच्या बाबी निदर्शनास आल्यास त्यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा आम्ही तत्परतेने दखल घेऊन पुढील कारवाई करू.-**सपोनि महादेव ढाकणे पोलीस स्टेशन दिंद्रूड**



# लोणारमध्ये बेताल वक्तव्याचा निषेध

## संतप्त:लोणीकरांच्या प्रतिमेला काँग्रेसने मारले जोडे

पुण्यभूमी प्रतिनिधी
लोणार: शहर काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आज दिनांक ३० जून २०२५ रोजी लोणार तहसील समोर जोडे मारो आंदोलन व लोणार तहसील चे तहसीलदार यांना निवेदन दिले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या सूचनेनुसार व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या आदेशानुसार लोणार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद, तालुका अध्यक्ष अश्रू फुके यांच्या नेतृत्वात भाजप आमदार बबन लोणीकर यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले शेतकऱ्यांविरोधात केलेल्या व्यक्तव्यामुळे भाजपचे आ. लोणीकर यांच्या विरोधात राज्यभरात संताप व्यक्त केल्या जात आहे. देखील याचे पडसाद उमटले असून, लोणार शहरात म काँग्रेस पक्षाच्या वतीनेफ च्या वतीने आंदोलन करण्यात आले.शहरातील तहसील समोर हे आंदोलन पार पडले. बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांना पेरायला सहा हजार तसेच आई बहिणीला पैसे आम्हीच दिले असे वादग्रस्त वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या भावनांना ठेच पोहोचवली आहे. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा काळ असताना लोणीकर यांनी परोपकाराची भाषा केली, मतदार कधीही हे विसरणार नाही, लोणीकरांचे निलंबन कराफ शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या **पान दोन...**

